# संपादकीय

**या योजना राबवताना कल्पकता दाखवा !**

महाराष्ट्र सरकारतर्फे खडूफळा योजना आणि विज्ञान साहित्य खरेदी या योजना गेली काही वर्षे युनेस्कोच्या प्रेरणेने रावबल्या जात आहेत. त्याद्वारे उपलब्ध निधीच्या मर्यादेत राहून बालकुमारांना व शिक्षकांना उपयुक्त अशी पुस्तके, विज्ञानविषयक पुस्तके आणि विज्ञानसाहित्य यांची खरेदी करण्यात येते. खडूफळा योजनेच्या पहिल्याच खरेदी योजनेच्या वेळी संबंधित अधिकारी व काही प्रकाशक यांनी तिच्यात सिंहाचा वाटा राखून ठेवण्याची व्यूहरचना केल्याने वृत्तपत्रांत उलटसुलट बातम्या आल्या. त्यामुळे अधिकाऱ्यांना ही योजना अधिक लोकाभिमुख करणे व नेहमीच्या खरेदीपेक्षा अधिक नेटकी करणे भाग पडले. तिच्यात तक्रारीला आणि भ्रष्टाचाराला वाव राहू नये अशा प्रकारे तिची अंमलबजावणी करण्यावर लक्ष केंद्रित करावे लागले. तरीही ही योजना राबवण्याबाबत अकारण कठोरपणा आणि अव्यवहारीपणा आणण्याचा प्रयत्न अधिकारीवर्ग कळतनकळत करीत राहिला. या योजनांची जाहिरात कमी खपाच्या वृत्तपत्रात देणे, पुस्तके व निविदा दाखल करण्यासाठी फार अपुरा अवधी देणे, निवड झाल्यावर पुरवठ्याचे आदेश देताना विलंब लावणे, पुरवठ्यासाठी फार तोटका अवधी देणे, पुस्तके जिल्हा किंवा तालुका पातळीवर पोचवण्याची अट घालणे आणि पुरवठा करण्यासाठी आधीच कमी वेळ देऊन प्रकाशकांना वेठीला धरणे, पुस्तकांच्या कमिशनबाबत घोळ घालणे, वगैरे बाबींवरून प्रकाशक-पुरवठादार यांच्या मनात कायमच असंतोष आहे. ते अखेर व्यावसायिक असतात. त्यामुळे या सगळ्या जाचक परिस्थितीतूनही या योजनांसाठी पुस्तके दाखल करतात, त्यासाठी भरपूर तपासणी फी भरतात, खूप काळ पुरवठ्याच्या आदेशाची वाट बघतात, आदेश आल्यावर धावपळ करून पुरेशा प्रती छापून वेळेच्या आत जिल्हा किंवा तालुका पातळीवर पोचवून पोचपावत्या आणून संबंधितांना देतात. आणि नंतर धनादेशाची प्रतीक्षा करीत बसतात. त्यासाठी भरलेल्या डिपॉझिटची रक्कमही कधीतरी मिळते. याबाबत काही निश्चित कालावधीचे पथ्य पाळण्याची निकड अधिकारी वर्गाला कधीच जाणवली नसावी. सरकारी कामकाजाची एकूणच पद्धत ही अशी लालफितीत अडकलेली व निश्चित धोरण स्पष्ट न करणारी असते. हजार-पाचशे प्रतींची एकदम ऑर्डर मिळते म्हणून प्रकाशक सगळी धावपळ करतात. शेवटी ते ग्रंथव्यवहारक्षेत्रात असतात. व्यावसायिक पातळीवर स्पर्धेत टिकून राहणे त्यांना अपरिहार्य असते. आपल्या अस्तित्वाचाच तो प्रश्न म्हणून सगळ्या अडीअडचणीतून मार्ग काढणे त्यांना क्रमप्राप्तच असते. खडूफळा योजना, विज्ञान साहित्य योजना याद्वारे काही कोटी रुपयांची खरेदी आजवर झालेली आहे. लेखक-प्रकाशक-विक्रेते यांच्याच प्रमाणे मुद्रक, चित्रकार, बाइंडर यांनाही तिचा लाभ झालेला आहे.

परंतु प्रकाशक ही सगळी दिव्ये पार करून पुस्तके वेळेवर पुरवतात हे लक्षात घेऊन, त्यांच्यावर अधिकाधिक बोजा लादण्याची प्रवृत्ती या योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये बळावत आहे. यंदा विज्ञान साहित्य खरेदीच्या बाबतीत हे फारच जाचक पातळीवर दिसून आले.

विज्ञानपुस्तकांच्या खरेदीची जबाबदारी नागपूरच्या विज्ञान संस्थेवर सोपवण्यात आलेली



आहे; आणि ती पार पाडताना दरवेळी नवनव्या समस्या निर्माण करण्याचा प्रयत्न संबंधित व्यक्तींकडून होतो आहे असे जाणवते. मागच्या खरेदीच्या वेळी प्रकाशकांना २५ टक्के कमिशन दिले तरच तुमची ऑर्डर काढू असे कळवून, अनेकांना ऑर्डर देण्याचे टाळण्यात आले. तपासणीशुल्क घेऊन निवडलेल्या पुस्तकांबाबत मूळ निविदेत नमूद केलेल्या कमिशनपेक्षा ऐनवेळी जास्त मागणी करणे हे मूलतःच गैर होते. निविदेच्या अटीत २५ टक्के कमिशन हवे यासारखी अट घातली असती तर ती गोष्ट वेगळी ठरली असती. परंतु प्रकाशकांनी विशिष्ट कमिशनचा दर दिल्यावर, त्यांच्या पुस्तकांची निवड झाल्यावर, जादा कमिशनची मागणी करण्याचा प्रकार हा हडेलहप्पीचाच मानावा लागेल. वाढीव कमिशनला मान्यता देण्यासाठी अल्प अवधी देण्यात आल्याने अनेक चांगली पुस्तके या खरेदीतून वगळली गेली. हा त्या प्रकाशकांवर धडधडीत अन्यायच होता.

यावेळी विज्ञान साहित्य खरेदीची जाहिरात नागपूरच्या वृत्तपत्रात देण्यात आली; ती पुण्या-मुंबईतील प्रकाशकांच्या सहजपणे वाचण्यात यावी अशी नव्हती. संबंधित अधिकाऱ्यांनी ही जाहिरात खरे तर महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता,सकाळ, लोकमत वगैरे जास्त खपाच्या व सर्वत्र जाणाऱ्या वृत्तपत्रांत द्यायला हवी होती. यापुढेही अशा जाहिरातींबाबत हे पथ्य पाळायलाच हवे. विशिष्ट भागातच खप असणाऱ्या एखाद्या पत्रात अशी जाहिरात देणे ही गोष्ट अधिकाऱ्यांच्या हेतूबद्दल संशय निर्माण करणारी आहे. अर्थात अशा कुठल्यातरी पत्रात जाहिरात आली तरी एका प्रकाशकाकडून दुसऱ्याला अशी माहिती मिळून, बरेच प्रकाशक निविदा भरतात ही गोष्ट वेगळी! परंतु मुळात अधिकाऱ्यांच्या मनात ह्या योजना पारदर्शक पद्धतीने राबवायची अशी इच्छा हवी.

यावेळी निविदेतील पुस्तकांसाठी दोनशे रुपये प्रत्येकी तपासणीशुल्क घेण्यात आले होते. पूर्वी ते शंभर होते. हे का वाढवण्यात आले ते कळत नाही. जी पुस्तके निवडली जातात. त्यांचे तपासणी शुल्क परत देण्याचेही धोरण हवे. अकारण जास्त पुस्तके प्रकाशकांनी पाठवू नयेत यासाठी हे शुल्क असावे. परंतु ते शंभरचे आज दोनशे केले, तर उद्या हजारही करायचा मोह अधिकाऱ्यांना होईल. या योजनेमागचा हेतूच त्यामुळे विफल होईल.

यावेळी आणखी एक बाब खटकणारी होती. एकतर निविदा सूचना प्रसिद्ध केल्यावर निविदा भरण्यासाठी वेळ फार कमी देण्यात आला, त्यामुळे नागपूरला समक्ष जाऊन त्या भरण्या बाबत अनेक प्रकाशकांना खूपच धावपळ करावी लागली. खरे तर पुण्यातही शिक्षणसंचालकांचे कार्यालय आहे, तेव्हा नागपूर व पुणे या दोन्ही ठिकाणी निविदाशुल्क भरणे व करार करणे सोयीचे ठरेल. शेवटी आपण महाराष्ट्रातच राहतो. एकीकडे विकेंद्रीकरणाच्या घोषणा आपण करतो, दुसरीकडे असे चमत्कारिक आग्रह धरतो. या निविदेच्या अटींमध्ये शाळावार पुरवठा करण्याची अट होती. ही अट अव्यावहारिक आणि अडवणूक करणारीच होती; पण तिच्याबद्दल काही वाद घालणे वा फेरविचारासाठी प्रयत्न करणे यासाठी अवधी नव्हता. त्यामुळे प्रकाशकांनी त्यावर सह्या केल्या.

या वेळच्या आर्डर निघायलाही उशीर झाल. मार्चमध्ये ऑर्डर निघून तीन आठवड्यात २५०० शाळांना पुस्तके पुरवून, पाचपाच प्रतीत बिले करून, ती दि,२६ मार्चच्या आत पोचवा असे सांगण्यात आले. कोणाही व्यक्तीला महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या जिल्ह्यातल्या २५०० शाळांना समक्ष पुस्तके देऊन पावत्या घेऊन येणे आणि तेही आठ-दहा दिवसात हे अशक्य आहे; दोनतीन

महिने मुदत असती तर गोष्ट वेगळी. परंतु महाराष्ट्राच्या भौगोलिक व्याप्तीबद्दल अनभिज्ञ असणाऱ्या अधिकाऱ्यांना आठ दिवसात २५०० शाळांना भेट देऊन प्रकाशकांनी पुस्तके पुरवून परत वेळेत यावे ही गोष्ट सुलभ वाटते हेच एक आश्चर्य आहे. शेवटी शिक्षणमंत्र्यांना भेटून जिल्हापातळीवर पुरवठा करण्याचा तोडगा निघाला हे खरे; पण आपल्या अधिकाऱ्यांची मूळ निविदा काढताना अव्यावहारिक शर्ती त्यात घुसडून देण्याची ही जी वृत्ती दिसते, ती काही प्रशंसनीय नक्कीच नाही.

...विज्ञानसाहित्य व खडूफळा योजना यांच्याबाबत प्रकाशकांच्या अडीअडचणी लक्षात घेऊनच मार्ग काढायला हवा. आपण निष्पक्षपणे निवड करतो हे दर्शवण्यासाठी जेवढे प्रकाशक निविदा भरतात, शक्यतो त्या सर्वांच्या कोणत्या ना कोणत्या पुस्तकांची निवड करण्याचे धोरण सरकारने अवलंबिलेले असते. परंतु त्यामुळे निवड करताना पुस्तकांच्या दर्जाचा पुरेसा विचार होतोच असे नाही. मुलांना अधिकाधिक चांगली पुस्तके उपलब्ध व्हावीत यासाठी खरेतर सरकारने प्रकाशक संघटना किंवा मुद्रण व्यवसायातील मान्यवर व्यक्तींशी विचारविनिमय करून पुस्तकांच्या पानांनुसार किंमतीबद्दलचा प्राथमिक अंदाज घेणे आवश्यक आहे. व सहा महिन्यांच्या अवधीत निवड केलेल्या विषयांवरील ठराविक पानांच्या पुस्तकांची जाहीर मागणी मांडली पाहिजे. त्यामुळे अधिकाधिक प्रकाशक दर्जेदार पुस्तकांची निर्मिती करतील व निवडीमध्ये फक्त दर्जालाच महत्त्व राहील.

या योजनांची अंमलबजावणी ही आजवर प्रकाशकांच्या धावपळीची परीक्षा पाहणारी ठरली आहे. चांगली दर्जेदार पुस्तके निर्माण होण्यासाठी आणि मराठी मुलांच्या अभिरुचीची उत्तम जडणघडण होण्यासाठी या योजनेकडे वेगळ्या मानसिकतेतून पाहणाऱ्या अधिकाऱ्यांची गरज आहे.

-संपादक




**आगामी आगामी आगामी**

**बिझिनेस लेजंड्स**

**मूळ लेखिका : गीता पिरामल**

**अनुवाद : अशोक जैन**

**जी. डी. बिर्ला, वालचंद हिराचंद दोशी, कस्तुरभाई लालभाई व जे. आर .डी. टाटा हे उद्योगमहर्षी म्हणजे भारताच्या औद्योगिक, आर्थिक विकासाचे मुख्य आधारस्तंभ. आपल्या देशभक्तीप्रवण उद्योजकतेतून व आर्थिक राष्ट्रवादाच्या दृष्टीकोनातून त्यांनी भारताची उज्ज्वल औद्योगिक प्रतिमा घडवली. त्यांच्या अफाट कर्तृत्वाचा, वैचारिकतेचा, आगळया जीवनशैलीचा चैतन्यमय आविष्कार घडवणारी जबरदस्त कलाकृती.**

**किंमत : ३०० रु.**







### ‘तत्त्वज्ञानविषयक लेखनाकडे मराठीत पुरेसे लक्ष नाही’

आचार, विचार आणि तत्त्वप्रणाली यांची माहिती तत्त्वज्ञानातून होत असते, तसेच धर्माच्या खऱ्या स्वरूपाची मांडणीही तत्त्वज्ञानामधून होते. त्यामुळेच तत्त्वज्ञानाची सामान्यांना ओळख करून देणे गरजेचे आहे दुर्दैवाने तत्त्वज्ञानविषयक लेखनाकडे पुरेसे लक्ष देण्यात आलेले नाही, अशी खंत कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. द.ना. धनागरे यांनी व्यक्त केली.

पुणे विद्यापीठ तत्त्वज्ञान विभाग आणि भारतीय तत्त्वज्ञान संशोधन परिषदेच्या वतीने ‘१९ आणि २० व्या शतकात मराठी भाषेतून झालेले तत्त्वचिंतन’ या विषयावर एक चर्चासत्र झाले. विभागप्रमुख प्रा.सदानंद मोरे यांनी चर्चासत्रामागील भूमिका स्पष्ट केली.

मराठीतील झालेल्या तत्त्वविचारांची माहिती देताना ज्येष्ठ विचारवंत प्रा.गो.पु देशपांडे यांनी सांगितले की, महात्मा ज्योतिबा फुले यांनी केलेली सुरुवात न्यायमूर्ती रानडे, भांडारकरांनी पुढे नेली. भक्ती कवितेच्या माध्यमातून तत्त्वज्ञानाची मांडणी झाली. त्यामध्ये धर्मविचारांची पुनर्मांडणी करण्याचे श्रेय संत तुकारामांकडे जाते. डॉ.आ.ह.साळुंखे आदींनी तो विचार पुढे सुरू ठेवला. कॉ.शरद पाटील यांनी वैदिक-अवैदिक तत्त्वज्ञानाची मांडणी केली.

### काशीनाथ घाणेकर म्हणजे एक अनाकलनीय कोडेच !

“ एक झपाटलेलं झाडं, एक लखलखीत झुंबर अशी निरनिराळी विशेषणं डॉ.काशीनाथ घाणेकर यांना वेगवेगळे वक्ते लावतात. मला स्वत:ला मात्र ते अनाकलनीय कोडेच वाटायचे. त्यांचे भेदक डोळे काळाच्याच आरपार बघत आहेत, असे वाटत राहायचे.’’ असे उद्गार ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर यांनी काढले.

डॉ.काशीनाथ घाणेकर स्मृती विश्वस्त प्रतिष्ठानतर्फे २ मार्चला मराठी रंगभूमीवर लक्षणीय कामगिरी बजावणाऱ्या तीन रंगकर्मींना पुरस्कार देण्यात आले.

मराठी रंगभूमीचे पुणेनिवासी अभ्यासक श्री. गो.रा.जोशी प्रमुख वक्ते होते. ‘काशीनाथला सुदैवाने फार मोठमोठ्या दिग्दर्शक-नाटककारांसह काम करण्याची संधी लाभली. देखणे रूप लाभलेल्या उच्चशिक्षित काशीनाथची भूमिकेत शिरायची हातोटीही विलक्षणच होती. मी अनेकांचे संभाजी रंगभूमीवर बघितले आहेत; पण काशीनाथचा संभाजी विसरू म्हणता विसरता येत नाही.’ असे जोशी म्हणाले.

ललितकलादर्शच्या माध्यमातून संगीत मराठी रंगभूमीची सात दशके सेवा बजावत असलेले, रंगकर्मी भालचद्र पेंढारकर यांना १० हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात आला. त्यांच्या खांद्याला खांदा लावून रंगभूमीवर वावरलेल्या, डॉ. घाणेकरांसोबत ‘गुंतता ह्रदय हे’ नाटकात त्यांच्या

मामीच्या भूमिकेत छाप पाडून गेलेल्या मालतीबाई पेंढारकरांना सात हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात आला. पार्किन्सनमुळे उठणेबसणेचालणेही कष्टप्रद असलेल्या मालतीबाई जिद्दीने या समारंभाला उपस्थित राहिल्या.

पाच हजार रुपयांचा तिसरा पुरस्कार चित्रकार कमल शेडगे यांना देण्यात आला. ३० वर्षात ५०० मराठी नाटकांच्या आकर्षक जाहिरातसंहिता त्यांनी तयार केल्या.

गाण्याचा उत्तम कान असलेले डॉ.काशीनाथ घाणेकर मालतीबाईना रंगमंचाबाहेरही 'मामी'च पुकारून त्यांचा मान राखायचे; दूरदर्शनवरील मामीच्या मुलाखतीतील नाट्यप्रयोग अभिनयासाठी आवश्यक रुमाल जागेवरच राहावा, यासाठी जातीने दक्षता घ्यायचे; 'गुंतता हृदय हे'च्या प्रयोगांच्या वेळी रंगभूमीवर कुठल्याही प्रकारे गैरवर्तन करणार नाही, हे आपल्याला दिलेले वचन त्यांनी शेवटपर्यंत पाळले; पडद्यामागील कामगार जेवल्याशिवाय स्वत: ते जेवत नसत, याचे किस्से भालचंद्र पेंढारकर त्यांनी सांगितले.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रभाकर पणशीकर यांनी पेंढारकरांचा सत्कार केला. दाजी पणजीकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. विश्वस्त चारुदत्त सरपोतदार यांनी आभार मानले.

गायक विनायक जोशी यांनी नवोदित गायिका गौरी कवी, संगीतकार उदय चितळे आणि कुशल निवेदक मिलिंद जोशी यांना सोबत घेऊन 'गाणी...आठवणी... आणि डॉ. काशीनाथ घाणेकर' हा चित्रपटगीतांचा कार्यक्रम सादर केला. मधुचंद्र, चंद्र होता साक्षीला, एकटी, सुखाची सावली, देवमाणूस, मराठी तितुका मेळवाव, पाठलाग, गारंबीचा बापू, हा खेळ सावल्यांचा आदी चित्रपटांतील 'झटकून टाक जिवा', 'हे चिंचेचे झाड', 'शूर आम्ही सरदार', 'या डोळ्यांची दोन पाखरं', 'गोमू संगतीनं', 'चल सोडून जा देश पक्षिणी' अशी लाकप्रिय गीते त्यात होती.

## शिवाजी सावंत यांची 'युगंधर' लवकरच हिंदीत

शिवाजी सावंत यांच्या 'युगंधर' या कादंबरीची हिंदी आवृत्ती लवकरच बाजारात येईल. त्यांच्या पत्नीनेच हा अनुवाद केला आहे.

राष्ट्रभाषा विषय घेऊन मृणालिनी सावंत पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून बी.ए. झाल्या. त्यानंतर तब्बल २० वर्षांनी गरवारेमधून त्यांनी एम.ए. केले. 'मृत्युंजय' कादंबरीचे भाषांतरही त्यांनी केले होते.

मूळ 'युगंधर'च्या वेळी लेखनिक म्हणून पहाटे ५ ते दुपारी १२ असे काही महिने त्या डिक्टेशन घेत होत्या. या कादंबरीचे प्रकाशक, भारतीय ज्ञानपीठचे उपसंचालक पद्मधर त्रिपाठी यांनी हिंदी मृत्युंजय वाचले होते आणि श्रीमती सावंत यांचे अनुवादकौशल्य त्यांना जाणवले होते.

## मराठमोळे परिधान

तरुणांना मराठी भाषेविषयी आकर्षण वाटावे, यासाठी विविध उपक्रम हाती घेतले जात आहेत. त्यात अथर्व प्रकाशनाच्या 'खास मराठमोळे परिधान' नाचा या उपक्रमात उल्लेख करायला हवा.

तरुणांना मराठीविषयी आपुलकी वाटावी, त्यांच्या मनातला मातृभाषेविषयीचा न्यूनगंड



दूर व्हावा, या हेतूने मिलिंद कुलकर्णी या प्रयोगशील छपाई व्यावसायिकाने 'परिधान' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली. मराठीतील म्हणी, गाणी, संतवचने, नाटकांची नावे टी-शर्टवर आणून मराठीपासून दूर गेलेल्यांना मराठीजवळ आणण्यासाठी 'परिधान'ची मुहूर्तमेढ रोवली गेली.

'ज्ञ ज्ञानेश्वराचा', 'नाच रे मोरा', 'ये रे ये रे पावसा', 'पुल, वपु, जीए, गदिमा... दैवत माझे', 'तू तिथं मी', 'सुंदरा मनामध्ये भरली', 'प्रेमा तुझा रंग कसा' अशी वचने या टी-शर्टवर आलेखण्यात आली आहेत. या संदर्भात श्री. कुलकर्णी म्हणाले की, 'आजची पिढी आपल्याला अगम्य अशा जपानी/ रशियन/ चिनी भाषा असणारे टी-शर्ट वापरते. त्याऐवजी 'परिधान' वापरल्यास मराठी भाषेतील पारंपरिक रचना, म्हणी, गाणी पोहोचतील आणि टिकू शकतील.' या शर्टाच्या मार्केटिंगबाबत अथर्व प्रकाशनाने जास्ते कदम धोरण अवलंबले आहे. कपड्यांच्या दुकानात भरपूर 'मार्जिन' देऊन हे शर्ट विकायला ठेवण्यापेक्षा पुस्तकांच्या दुकानांतूनच यांचे वितरण करण्यावर सुरुवातीस भर दिला जाणार आहे. ठाण्यात मॅजेस्टिक बुक डेपो येथे विक्री सुरू झाली असून लवकरच डोंबिवली, पार्ले, पुणे या शहरांत हे शर्ट विक्रीसाठी उपलब्ध होतील. जयंत साळगावकरांनी मराठी कॅलेंडरची मराठी माणसाला सवय लावली. तशीच याही उपक्रमाची आखणी करावी, असा प्रयत्न आहे. सध्याच्या 'ट्रेण्ड' प्रमाणे टी-शर्टचा पर्याय त्यांनी स्वीकारला.

तरुणांमध्ये मराठीविषयी आस्था निर्माण करू पाहणाऱ्या या उपक्रमाचे स्वागत करताना वसुंधरा पेंडसे-नाईक म्हणाल्या,''परिधान' उपक्रम स्वागतार्ह वाटतो. एकाने तसा शर्ट घातला आणि दहाजणांनी त्याचे अनुकरण केले तर चांगलेच आहे. यानिमित्ताने चांगल्या कविता, वचने यांचीही नव्या पिढीला ओळख होईल. या सारख्या नैमित्तिक उपक्रमांबरोबरच पालकांनी आपल्या पाल्याच्या मनात मातृभाषेविषयी आस्था निर्माण केली पाहिजे. कोणतीही भाषा वापरताना ती शुद्ध स्वरूपातच वापरली जाईल, याची खबरदारी घ्यायला हवी. आपण मराठीवर प्रेम करतो, हे कृतीतून दिसायला हवे.''

रत्नाकर मतकरी यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. ते म्हणाले की मराठीतील शुभेच्छापत्रे, टी-शर्ट याद्वारे तरुणांमध्ये मराठीचा वापर वाढणार असेल तर ही गोष्ट स्वागतार्ह आहे.

## दिल्लीतील मराठी संस्था : वनिता समाज

राजधानीत अडीच लाख मराठी माणसे राहतात. वेगवेगळे कार्यक्रम करून मराठीपण जपण्याचा प्रयत्न करतात; परंतु या सर्वात उठून दिसते, १९५३ मध्ये स्थापन झालेली 'वनिता समाज'ही संस्था. यंदा ती आपले सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करीत आहे.

'वनिता समाज'च्या सचिव सुनिता हरकरे म्हणाल्या,'मकर संक्रांतीच्या, हळदी-कुंकवाच्या निमित्ताने मराठी भगिनी एकमेकींना भेटत. अशाच एका भेटीत गुलाब कर्णिक, सुशीला करंदीकर, कमल प्रधान आणि कमल सोनटक्के यांनी दिल्लीतील मराठी महिलांना एकत्र आणून ३ फेब्रुवारी १९५३ रोजी 'वनिता समाजा'ची स्थापना केली.'

प्रारंभी कॅनॉट प्लेस भागातील मद्रास हॉटेलच्या सभागृहात वनिता समाजचे कार्यक्रम होत, नंतर महाराष्ट्र क्लबमध्ये महिला जमू लागल्या. जागेची अडचण होती. १९६४ मध्ये सुशीला

जोशी व अन्य महिलांनी स्वत:ची जागा घेण्याचा विचार केला. नाटकाचा प्रयोग करून जमलेल्या १६ हजार रुपयांतून लोधी रोडवर एक भूखंड खरेदी केला. वास्तू उभी करण्यासाठी सुहासताई जोशी आणि प्रभाताई गोखले यांनी देणग्या गोळा केल्या. अनेकांनी सहकार्य केले. पार्वतीबाई आणि विश्वासराव चौगुले यांनी एकएक खोली बांधून दिली. १९७१ मध्ये तत्कातीन राष्ट्रपती व्ही.व्ही.गिरी यांच्या हस्ते इमारतीचा पायाभरणी सोहळा पार पडला. ३१ मार्च १९७३ रोजी तत्कालीन कायदे मंत्री ह.रा. गोखले यांच्या हस्ते वास्तूचे उद्घाटन झाले. १९७८ मध्ये त्या वेळचे पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेने आपला रौप्यमहोत्सव साजरा केला.

सुरुवातीच्या काळात औपचारिक कार्यक्रम करणारी ही संस्था हळूहळू दिल्लीतील मराठी समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग बनत गेली.

संस्थेच्या वतीने सध्या चार उपक्रम चालतात. संस्थेची शाळा दीपा भानू चालवितात. परिसरातील सुमारे शंभर मुले तिचा लाभ घेतात. उषा थत्ते यांच्याकडे वाचनालयाची जबाबदारी आहे. या वाचनालयात मराठीप्रमाणेच अन्य भाषांतील पुस्तके आहेत.

वधू-वर सूचक मंडळ चालविले जाते. सविता गोखले यांच्याकडे या उपक्रमाची जबाबदारी आहे. दिल्लीत राहणाऱ्या मराठी माणसाला मराठी चवीचे खाणे दुर्मिळ असते. ते उपलब्ध करून देण्यासाठी उद्योग मंदिर आहे. प्रीती पावसकर उद्योग मंदिराची जबाबदारी संभाळतात.

वसंत पंचमीला संध्याकाळ. समाजाचा वर्धापनदिन सोहळा प्रमुख पाहुणे ना. धों. महानोर यांच्या हस्ते झाला. आयुष्याची वाटचाल आणि कवितेची वळणे सांगताना अडीच तासाची मैफल रंगली. भरपूर रसपान करूनही तृष्णा कायम, अशी स्थिती झाली.

वनिता समाजाचे साडेतीनशे सभासद आहेत. सध्या शशिताई कुलकर्णी या अध्यक्ष आहेत. सुनीता हरकरे आणि गीता हवारदार या सचिव.

पत्ता: वनिता समाज, १३ इन्स्टिट्यूशनल एरिया, लोधी रोड, नवी दिल्ली ३

## बंजारा भाषेला राज्यघटनेत महत्त्वाचे स्थान देण्याची मागणी

बंजारा भाषेला भारताच्या घटनेत महत्त्वाचे स्थान द्यावे, तसेच बंजारा जमातीला घटनात्मक संरक्षण देण्यासाठी तिसरी अनुसूचित जाती निर्माण करावी, या मागण्यांसाठी बंजारा क्रांतिदलाचे सरसेनापती हरिभाऊ राठोड यांच्या अध्यक्षतेखाली पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेण्यात आला.

बंजारा समाज हा दुर्लक्षित राहिलेला समाज असून, या समाजातील लोक अद्याप भटक्या स्थितीत आहेत. जातीचा दाखला मिळत नसल्यामुळे आजही हा समाज सरकारी सवलतींपासून वंचित आहे. हे चित्र बदलायचे असले, तर भटक्या समाजातील गरिबांना घरे, पाणी याबरोबरच आदी सुखसुविधा देण्यात याव्यात. कोंढवे बुद्रुक येथील ९ एकर जागा, तसेच खडकवासला येथील तांड्याची जागा गावठाण म्हणून गरीब रहिवाशांच्या नावे करावी, बंजारा समाजाला जातीचा दाखला देण्यातील अडचणी दूर करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक बोलवावी, लक्ष्मीनगर, कोथरूड बंजारा झोपडपट्टीतील रहिवाशांची नावे मतदार यादीत टाकण्यात यावी अशाही मागण्या त्यांनी केल्या.



## प्रादेशिक भाषांतील अधिकाधिक साहित्य अन्य भाषांत येणे आवश्यक

प्रादेशिक भाषांमध्ये तयार झालेले साहित्य देश आणि जगभरात लोकप्रिय व्हावे यासाठी त्यांची अन्य भाषांत भाषांतरे करण्याची गरज असल्याचे मत प्रख्यात उडिया साहित्यिक सीताकांत महापात्र यांनी व्यक्त केले आहे. माजी सनदी अधिकारी असलेले महापात्र सध्या नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष आहेत.

महापात्र यांच्या मते विविध भाषांमधील पुस्तकांची भाषांतरे झाली, तर दर्जेदार साहित्याचा आस्वाद देशातील, तसेच जगभरातील रसिक वाचक घेऊ शकतील. भारतात अनेक भाषांमध्ये दर्जेदार साहित्य निर्मिती होत असते. मात्र भाषांतरे होत नसल्याने अनेक नामवंत प्रादेशिक लेखकांची प्रतिभा केवळ त्या भागापुरतीच मर्यादित राहते.

स्वत: महापात्र यांचे १४ काव्यसंग्रह जवळपास सर्व भारतीय भाषांत प्रसिद्ध झाले असून स्पॅनिश, फ्रेंच, जर्मन, रशियन आणि डेनिश भाषामध्येही त्यांच्या काव्यसंग्रहांचे भाषांतर झाले आहे.

१९९३ मध्ये भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार, ओरिसा साहित्य अकादमी पुरस्कार, कुमारन आसान काव्य पुरस्कार, सोव्हिएट लँड नेहरू पुरस्कार, विश्व हिंदी संमेलन पुरस्कार, सरला पुरस्कार हे आणि असे अनेक त्यांना मिळाले आहेत. महापात्र यांच्या मते विचारांचे आदानप्रदान आणि लोकांमध्ये परस्परांच्या साहित्याची अभिरुची निर्माण होण्यासाठी भाषांतरांची गरज आहे.

## कुंभोजकरांनी शिक्षकी पेशाची प्रतिष्ठा वाढविली

'प्रा. वसंत कुंभोजकर यांच्या मनाची श्रीमंती मोठी असून अनेक विद्यार्थी घडवून त्यांनी शिक्षकी पेशाची प्रतिष्ठा वाढविली' असे गौरवपूर्ण उद्गार ख्यातनाम विनोदी लेखक द.मा.मिरासदार यांनी अमृत महोत्सव प्रसंगी काढले.

एका शिक्षकाचा उत्स्फूर्त सत्कार होत असताना पाहून आपण भारावून गेलो आहोत, असे प्रा. मिरासदारांनी सांगितले. डॉक्टरांकडे पैसा मानमरातब असतो, पण तो नेहमी रुग्ण चेहऱ्याच्या सान्निध्यात असतो. वकील मंडळींही गुन्हेगारी व भानगडी करणाऱ्यांच्या सान्निध्यात असतात. पण शिक्षक मात्र आईने न्हाऊ घालून पाठविलेल्या गोंडस मुलांच्या सान्निध्यात वावरतो. कुंभोजकरांनी सहजतेने व अभिनिवेश न बाळगता विद्यार्थ्यांमध्ये संस्काराचे अंकुर रुजविले. आजही विद्यार्थी त्यांची कृतज्ञतेने आठवण करतात, हा मोठा ठेवा आहे.

ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ श्री.वि.वि. चिपळूणकर म्हणाले: कर्मसंस्कृती जपणारे प्रा. वसंत कुंभोजकर हे सच्चे देशभक्त आहेत. शिक्षकी पेशाच्या माध्यमातून हा संस्कार करण्याची त्यांची उत्कट इच्छा आहे.

महंत नागराजबाबा यांचेही यावेळी भाषण झाले. विद्यार्थ्यांच्या वतीने ॲड.राजेंद्र गोडबोले यांनी सांगितले की, प्रा. कुंभोजकरांनी अनेक विद्यार्थ्यांना चेहरे दिले व विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. सांगलीचे काशिनाथ वाडेकर यांनी कुंभोजकरांच्या डोळ्यात विद्यार्थ्यांची निवड करण्याचा 'सर्च लाईट' असल्याचे सांगितले. ख्यातनाम समीक्षक डॉ. म.अ. कुलकर्णी यांनीही कुंभोजकरांच्या काही पैलूंवर प्रकाश टाकला.

सत्काराला कुंभोजकरांनी दिलेले उत्तर भारावून टाकणारे होते. 'आजही अनेक शिक्षक

चांगले काम करीत असून त्यांना थोडी चांगली दिशा देण्याची गरज आहे.' 'गर्वसे कहो हम शिक्षक है' हा अभिमान शिक्षकीपेशातील मंडळींनी बाळगण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

### 'आत्मस्वर सच्चा असेल, तर कविता वाचकांच्या मनाला भिडते'

कवितेतला आत्मस्वर सच्चा असेल तर ती वाचकांच्या मनाला जाऊन भिडते. सुरेश पाचकवडे यांच्या 'ग्रीष्मपर्व' या काव्यसंग्रहातील कविताही अशाच अंतर्मुख करणाऱ्या, मनाला भिडणाऱ्या आहेत, असे प्रतिपादन कवी नारायण कुलकर्णी कवठेकर यांनी केले.

अकोला महापालिकेचे आयुक्त लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. सुरेश पाचकवडे हा माणूस सोन्यासारखा आहे. त्याची कविताही तशीन बावनकशी आहे. कवीच्या स्वभावाचे प्रतिबिंब त्याच्या कवितेतून उमटते, असे उद्गार कवठेकर यांनी काढले.

आयुष्यात एखादी घटना अशी घडते की जी माणसाची जीवनाकडे बघण्याची दृष्टी बदलते. कवी या अनुभवांना वेदनेला शब्दांत गुंफतो. कवीने नाव, घटना, तपशील, प्रसंग सांगत न बसता कवितेची सरळ सरळ गुंफण केल्यास ती कविता प्रभावी होते, मानवी जीवनातील अटळ दु:ख, वेदना, विरह यांना पाचकवडे यांनी सुंदर शब्दरूप दिले, असे देशमुख म्हणाले.

### 'एकवचनी'चा शानदार प्रकाशन सोहळा

दै.'सामना'चे कार्यकारी संपादक संजय राऊत यांनी वेळोवेळी घेतलेल्या शिवसेनाप्रमुखांच्या ५२ वादळी मुलाखतींचा संग्रह 'एकवचनी' 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने प्रकाशित केला आहे.

ठाणे येथील गडकरी रंगायतनमध्ये 'एकवचनी'चा प्रकाशन सोहळा मोठ्या जोशात पार पडला. केंद्रीय मंत्री प्रमोद महाजन, मनोहर जोशी, आणि ज्यातिर्भास्कर जयंतराव साळगावकर यांनी शिवसेनाप्रमुखांनी आजन्म स्वीकारलेल्या 'एकवचनी' भूमिकेविषयी आदर व्यक्त केला. त्यांच्या भाषणांचा उल्लेख करीत शिवसेनाप्रमुखांनी सुरुवातीलाच हास्यस्फोट केला. सर्वच माझी इतकी स्तुती करताहेत की शरीराच्या कुठल्या कुठल्या भागाला गुदगुल्या होताहेत हेच कळत नाही. शिव्या खाणाऱ्या या माणसासाठी आज ओव्या गायला जात आहेत. ज्यातिषमार्तंडाच्या हस्ते 'एकवचनी'चे प्रकाशन झाले. पुस्तकाची कुंडली ते मांडतील. पण या पुस्तकाला त्रास होणार नाही कारण मीच सर्वांच्या वक्री बसलोय, या उद्गारावर आणखी हास्यकल्लोळ उडाला.

शिवसेनाप्रमुख म्हणाले, आज मी ठाणेकरांना खास धन्यवाद द्यायला आलोय. गडकरी रंगायतनमध्ये मी हे बोलत असलो तरी हे नाटक नाही. सत्य आहे. पहिला भगवा ठाण्याने फडकावला. आता पुन्हा बहुमताने ठाणेकरांनी भगव्याचा मान राखलाय. भगव्याचा अभिमान जागा ठेवलात त्याबद्दल तुम्हाला धन्यवाद, असे उद्गार काढताच ठाणेकरांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

''तुम्हाला खुर्च्या उबवायला मी शिवसेनेला जन्म दिला नाही. वडिलांनी आम्हाला घडविले. त्यांचेच 'दुर्गुण' म्हणा हवे तर आमच्या रक्तात आले. आम्ही आश्वासने देत नाही. वचन देतो. आयुष्यात कमवायचे नाही, हाच ध्यास आहे. जो एकवचनी नाही तो ठाकरे नाही. दिलेला शब्द पाळायचा याच वृत्तीने आम्ही जगतोय, जगणार आहोत.''

'एकवचनी'या पुस्तकाचे कौतुक करताना शिवसेनाप्रमुख म्हणाले की, छपाई उत्तम आहे.



सर्वच म्हणतात मला वेडेवाकडे प्रश्न विचारायची संजयला हिंमत कशी झाली? पण संजय माझ्याकडे यायचा. तुमच्या मुलाखतीची खूप गरज आहे, हे पटवून द्यायचा. मग मीही म्हणायचो, ठीक आहे, कोणतेही हलकट प्रश्न मला विचार. माझी तयारी आहे. पत्रकार माझे दुष्मन नाहीत. पण एकूणच लिखाणाचा साचेबंद ढाचा ठरला आहे. सतत हल्ले व्हायचे. निवडणुकीच्या वेळी हे हल्ले महाग पडत, म्हणूनच 'सामना'ला जन्म द्यावा लागला.

वृत्तपत्र हे जबरदस्त हत्यार आहे. पत्रकार संघात टिळक, आगरकर, अत्र्यांचे फोटो आहेत. प्रबोधनकारांचाही फोटो आहे. हा जातो कधी आणि त्याचा फोटो टांगतो कधी असे हे पत्रकार, असे सांगताना शिवसेनाप्रमुखांचा स्वर कडवा झाला. महाराष्ट्राची पत्रकारिता जाज्वल्य हवी. जळती ज्योत हवी. आमदार, खासदारांना विकली जाणारी ही भाडखाऊ पत्रकारिता देशाला तारू शकत नाही. मी सर्वांना बाजूला ठेवले. चुकल्यावर मी कुणालाही क्षमा केली नाही. हवे तर मनोहर जोशींना विचारा, असा टोला शिवसेनाप्रमुखांनी लगावला. हल्ली मी मुलाखतींच्या वेळी टेपरेकॉर्डर ठेवतो, असे सांगून शिवसेनाप्रमुखांनी 'टाइम वीकली'मध्ये प्रसिद्ध झालेल्या मुलाखतीचा किस्सा ऐकविला.

केंद्रीय माहिती व तंत्रज्ञानमंत्री प्रमोद महाजन या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. 'एकवचनी' या पुस्तकाबद्दल गौरवोद्गार काढताना ते म्हणाले की, हिंदुत्वाच्या विचारांवर श्रद्धा ठेवणाऱ्या कार्यकर्त्यांचे विचार अथवा श्रद्धा डळमळीत झाली तर या पुस्तकातील कोणतेही पान काढून वाचावे. बाळासाहेबांचे तेज:पुंज विचार वाचल्यानंतर पुन्हा काम करण्याची प्रेरणा निश्चितपणे मिळेल. शिवसेनाप्रमुखांचे विचार जगभर पोहोचावेत म्हणून 'एकवचनी'या पुस्तकाचे इंग्रजीत भाषांतर करावे, अशी सूचना मनोहर जोशी यांनी केली. त्याचा संदर्भ देऊन ते म्हणाले की, हे पुस्तक मराठीतच असले पाहिजे. त्याचे इंग्रजी भाषांतर करणे अवघड आहे. मराठीतूनच शिवसेनाप्रमुखांचे विचार खऱ्या अर्थाने समजू शकतील.

पुस्तकाबद्दलची एक आठवण सांगताना ते म्हणाले की, मी व पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी एका कार्यक्रमाला जात असताना राऊत यांचे 'एकवचनी' पुस्तक सोबत होते. वाजपेयी



डावीकडून प्रमोद महाजन, बाळासाहेब ठाकरे, मनोहर जोशी, जयंतराव साळगांवकर, अनिल मेहता व लेखक संजय राऊत.

यांनी ते पुस्तक पाहताच माझ्याकडून ते मागून घेतले व स्वत: पंधरावीस मिनिटे चाळले. पंतप्रधानांनीही या पुस्तकाबद्दल गौरवोद्गार काढले. शिवसेनाप्रमुखांच्या मनात कोणत्याही प्रश्नांबद्दल कधीही गोंधळ नसतो. जबरदस्त आत्मविश्वास असलेला दुसरा राजकीय नेता संपूर्ण हिंदुस्थानात मी पाहिला नाही. म्हणूनच खऱ्या अर्थाने ते 'एकवचनी' आहेत.

केंद्रीय मंत्री मनोहर जोशी यांनी सांगितले की, 'एकवचनी'हे पुस्तक म्हणजे हिंदुत्वाचा दीपस्तंभ तसेच शिवसेनेचा इतिहास आहे. शिवसेनाप्रमुखांच्या मुलाखतींचा ५२ हिऱ्यांचा हा हार असून संजय राऊत यांनी 'गनिमी काव्या'ने बाळासाहेबांचे जणू आत्मचरित्र लिहिले आहे. साहेब जो शब्द देतात तो एखाद्या बाणासारखा किंवा बंदुकीसारखा असतो. दिलेला शब्द ते कधीही बदलत नाहीत. म्हणूनच ते 'एकवचनी' आहेत. गेली ३५ वर्षे मी शिवसेनाप्रमुखांच्या सान्निध्यात राहूनही त्यांना काही प्रश्न विचारायचे धाडस करू शकलो नाही. पण राऊत यांनी ते मोठ्या खुबीने केले असल्याचे जोशी यांनी नमूद केले.

ज्योतिर्भास्कर जयंतराव साळगावकर यांनी तुताऱ्यांच्या निनादात 'एकवचनी'या पुस्तकाचे प्रकाशन केले. त्यानंतर बोलताना ते म्हणाले की, प्रत्येक मराठी माणसाने आवर्जून हे पुस्तक वाचले पाहिजे. शिवसेनाप्रमुखांचा धर्माभिमान, त्यांचे व्यक्तिगत जीवन, हिंदुत्वाबद्दलचे विचार त्यातून व्यक्त झाले आहेत.

लेखक संजय राऊत यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, शिवसेनाप्रमुखांचे बावनकशी विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे तसेच शिवसेनेच्या राजकीय घडामोडी नोंदविण्याचे काम फक्त मी या निमित्ताने केले आहे. जे एकवचनी असतात त्यांनाच एकनिष्ठ समर्थक मिळतात. शिवसेनाप्रमुखांच्या विचारांची ही शक्ती असून मी घेतलेल्या मुलाखतींमध्ये त्यांचा मूड आहे, संताप आहे व चीडही आहे.

'एकवचनी' पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यासाठी गडकरी रंगायतनमधील व्यासपीठ खास पद्धतीने सजविण्यात आले होते. एका बाजूला पुस्तकाच्या मुखपृष्ठाची तर मागे 'सामना'ची भव्य प्रतिकृती होती. त्यावर शिवसेनाप्रमुखांच्या मॅरेथॉन मुलाखतीतील निवडक मजकूर मोठ्या कलात्मकतेने लिहिण्यात आला होता. विशेषत: 'जनता शिवसेनेला दगा देणार नाही' हा मथळा उठावदार दिसत होता. या सजावटीमागील कल्पना शिवसेनेचे आमदार शिशिर शिंदे यांची होती, ती नाट्यदिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे यांनी प्रत्यक्षात साकार केली होती.

प्रमोद महाजन यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ज्यांच्या हिंदुत्वावरील निष्ठा डळमळीत झाल्या असतील त्यांनी 'एकवचनी'मधील शिवसेनाप्रमुखांच्या मुलाखती वाचल्या तर जाज्वल्य हिंदुत्व पुन्हा जागृत होईल. महाजन यांच्या याच मुद्यावर बोलताना शिवसेनाप्रमुखांनी केंद्र सरकारवर जोरदार टोला लगावला की, असे असेल तर 'एकवचनी'च्या प्रती केंद्रातील तुमच्या लोकांमध्ये वाटा! त्यामुळे काही नाही तर निदान राममंदिर तरी उभे राहील, असे सांगतानाच शिवसेनाप्रमुख गरजले, राममंदिर कोणत्याही स्थितीत उभे राहिलेच पाहिजे. कलात्मकरीत्या सजवलेल्या व्यासपीठावर हिंदुहृदसम्राट शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे, सुभाष देसाई, केंद्रीय अवजड उद्योगमंत्री प्रमोद महाजन, लीलाधर डाके, दत्ताजी नलावडे, मधुकर सरपोतदार, प्रकाशक अनिल मेहता, लेखक संजय राऊत, ज्यातिर्भास्कर जयंतराव साळगावकर आदी उपस्थित होते.



## 'बायबल'च्या वितरकाला तुरुंगवास

चीनमधील ख्रिश्चन संघटनांसाठी 'बायबल'च्या प्रतींची आयात केल्याबद्दल दोन वर्षे तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आलेल्या ली म्युआनक्विआंग या व्यापाऱ्याची अनपेक्षितपणे मुक्तता करण्यात आली. वैद्यकीय कारणास्तव त्याला सोडण्यात आले असल्याचे सरकारी स्तरावर सांगण्यात येत असले तरी अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांच्या भेटीस कोणत्याही वादग्रस्त विषयाची पार्श्वभूमी प्राप्त होऊ नये म्हणूनच हे पाऊल उचलले गेले. लीच्या सुटकेसाठी बुश यांनी चीनच्या नेत्यांकडे शब्द टाकला होता. विशेष म्हणजे ज्या चीनमध्ये देहदंडाच्या शिक्षेचीच तरतूद आहे, परंतु अमेरिकेच्या दबावामुळे अखेर दहा हजार डॉलर दंड घेऊनच लीस मुक्त करण्यात आले.

## 'एक ठिणगी आभाळभर'चे प्रकाशन

वेदनेतून निर्माण झालेल्या साहित्याला वास्तवतची खोली असते. फलटणचे रंगा दाते यांची एक ठिणगी आभाळभर ही कादंबरी अशाच प्रकारच्या सामाजिक वेदनेचा आविष्कार आहे. वास्तवतेचे भान राखूनही ती सामाजिक कटुता येऊ देत नाही हे वैशिष्ट्य आहे असे रवींद्र बेडकिहाळ यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या फलटण शाखेच्या वतीने या कादंबरीवर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

कोकणातून नशीब काढण्यासाठी देशावर आलेल्या मनोहर बल्लाळ साने या कुटुंबाच्या तीन पिढ्यांच्या कष्टाचा, अथक परिश्रमाचा आणि १९४८ च्या जातीय दंगलीत भोगलेल्या वेदनांचा आणि त्यातूनही फिनिक्स पक्ष्याप्रमाणे उभारी घेतलेल्या वास्तवतेचा प्रवास म्हणजे ही कादंबरी आहे.

१९४८ च्या जातीय दंगलीचे कटके बसलेल्या एक ब्राम्हण कुटुंबाची कथा माझ्या कादंबरीत असली तरी तो इतिहास आहे. अशा दंगलीतून माणुसकी पोरकी कशी होते आणि माणुसकीची पारखही कशी होते हे आपण या कादंबरीद्वारे दाखवले आहे. अशा इतिहासातून समाजाने काही शिकावे, समाज सुधारणा व्हावी अशी आपली भूमिका आहे असे मनोगत लेखक रंगा दाते यांनी व्यक्त केले.

दंगलीचा वणवा पसरू नये याची दक्षता ज्या जबाबदारीने प्रसारमाध्यमांनी घ्यायला पाहिजे तेवढी घेतली जात नसल्याचे प्राचार्य वि.अ.शेख यांनी स्पष्ट केले. वध, खून, हत्या आणि धर्माधर्मातील तेढ यातून निर्माण होणाऱ्या दंगलीतून माणुसकीच जळून जात असेल तर माणसाने जगायचे तरी कशाला हा सामाजिक प्रश्न या कादंबरीत प्रभावीपणाने हाताळला गेला आहे असे ते म्हणाले.

## मराठी प्रकाशक संघटनांची मागणी मान्य

गणित-विज्ञान योजनेअंतर्गत तयार केलेली पुस्तके शाळांना मुदतीमध्ये पोचवण्याच्या कामात येणाऱ्या संभाव्य अडचणींचे निवेदन मराठी प्रकाशक संघटनांनी शालेय शिक्षणमंत्री रामकृष्ण मोरे यांची भेट घेऊन दिले होते; त्यावेळी शिक्षणमंत्र्यांनी पुस्तके शाळांना पोचवण्यातील

व्यावहारिक अडचणी लक्षात घेऊन, ती जिल्हापोच करण्याचे आदेश देण्याची सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिली. त्यानंतर आयोजित केलेल्या सभेत शिक्षणमंत्र्यांनी हा प्रश्न सोडविण्यासाठी केलेल्या प्रयत्नाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. संपर्क : अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ, द्वारा दिलीपराज प्रकाशन, २५१ क, शनिवार पेठ, पुणे-३० व मराठी प्रकाशक परिषद, २८/अ, बुधवार पेठ, अंबर चेंबर्स, चौथा मजला, अप्पा बळवंत चौक, पुणे ४११ ००२

## बृहन्महाराष्ट्रातील मराठी साहित्य

महाराष्ट्राबाहेरील प्रदेशांत निर्माण होणारे मराठी साहित्य हा खरे तर एका चांगल्या विस्तृत संशोधन प्रकल्पाचाच विषय आहे. असा एखादा उपक्रम जेव्हा केव्हा प्रवर्तित होईल तेव्हा होवो, परंतु, मराठी साहित्येतिहासाच्या दृष्टीने जिव्हाळ्याच्या असणाऱ्या या विषयाच्या विविध पैलूंच्या निदान कक्षा तरी नजरेच्या टप्प्यात याव्यात या हेतूने साहित्य अकादमीची मुंबई शाखा आणि कोलकत्याचे महाराष्ट्र मंडळ यांच्या विद्यमाने महाराष्ट्र मंडळाच्या टिळक सभागृहात 'बृहन्महाराष्ट्रातील मराठी साहित्य'या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. शनिवार, २ फेब्रुवारी रोजी, नामवंत बंगाली कवी आणि शेरीफ सुनील गंगोपाध्याय यांनी दीप प्रज्वलन करून चर्चासत्राचे उद्घाटन केले.

महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर डोळे यांनी स्वागत केले. प्रसिद्ध लेखक भालचंद्र नेमाडे यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले की, भाषावार प्रांतरचनेमुळे प्रांतिक भाषांचा विकास झाला हे खरे, परंतु हा युरापीय प्रकार आहे. तथापि महाराष्ट्रात मराठी माणूस वाढतो आहे. तसेच महाराष्ट्रातील सिंधी, पंजाबी, गुजराती या समाजांचे लोकही आपणास महाराष्ट्रीय म्हणवितात. असा परिस्थितीत मराठी साहित्याबद्दल आस्था असणाऱ्या सगळ्यांच्याच दृष्टीने हे चर्चासत्र लाभदायक होईल.

नागपूर विद्यापीठातील डॉ.भास्कर भोळे बीजभाषण सादर करताना म्हणाले, ''गेल्या ३५० वर्षांपासून महाराष्ट्राबाहेर मराठीची शक्तिकेंद्रे आहेत. देशांतर केलेल्या लोकांत सांस्कृतिक परिवर्तन झालेले दिसते. त्यांच्यात सांस्कृतिक समन्वय, ऐतिहासिक, भौगोलिक, भाषिक परिवर्तन झाले असले तरी त्यांनी आपली भाषा व साहित्य टिकवले आहे. भविष्यात महाराष्ट्रातील लोकांना बृहन्महाराष्ट्रात जाऊन मराठीचे अध्ययन करावे लागेल की काय, अशी शंका वाटते.'' अनिवासी भारतीयांचा दृष्टिकोन भारताबद्दल अजूनही बुरसटलेलाच आहे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सुनील गंगोपाध्याय यांनी सखाराम गणेश देऊस्कर यांच्या कार्याचा उल्लेख करून, बंगालमधील क्रांतिकारकांना प्रेरणा देण्याच्या लोकमान्य टिळकांच्या कार्याचाही खास निर्देश केला. वसंत पोतदार यांचे लेखन बंगालीत प्रसिद्ध झाले असल्याचेही त्यांनी नमूद केले. विजय तेंडूलकरांच्या नाटकांचे रूपांतर बंगालीत झाले असून, त्याचे प्रयोगही झाले आहेत, मराठी साहित्य हे श्रेष्ठ आहे, असे उद्गार त्यांनी काढले.

चर्चासत्रातील पहिल्या सत्राचा विषय होता, 'माळवा, महाकौशल, उत्तर-मध्य प्रदेश व सागर या भागांतील मराठी साहित्य'. या सत्राचे अध्यक्ष होते इंदूरचे डॉ.अनिल गजभिए. उज्जैनचे डॉ.शशिकान्त सावंत यांनी माळवा भागातील मराठी साहित्य निर्मितीचा आढावा घेतला. जबलपूरचे डॉ.शरद महाजन यांनी महाकौशल भागातील मराठी साहित्याचा परिचय करून दिला. ग्वाल्हेरचे



डॉ.केशव कान्हेरे यांनी महादजी शिंदे यांच्या 'माधवविलास'या मराठी काव्यापासून ते २००१ सालापर्यंतच्या साहित्य निर्मितीची वाटचाल स्पष्ट केली. 'उत्तर-मध्य प्रदेश मराठी साहित्य हे काही वेगळे आहे का? त्यात काही नवे प्रवाह दिसतात का? ग्वाल्हेरी मराठी भाषा कशी होती व आहे यावर आजपर्यंत प्रकाश का टाकला गेला नाही?असे प्रश्न सतीश बडवे यांनी उपस्थित केले. भोपाळचे पाठक म्हणाले की, भोपाळ, विदिशा, छत्तीसगड या भागातील साहित्याचा परिचय करून घेणे हे आज आवश्यक आहे.'

दुसऱ्या चर्चासत्रात बंगाल, दिल्ली, उत्तरप्रदेश, गुजराथ व राजस्थान या राज्यांतील मराठी साहित्यावर निबंधवाचन व चर्चा झाली. तारा पंडित यांनी बंगालच्या मराठी साहित्यावर निबंध सादर केला. तर, अरविंद दीक्षितांनी दिल्ली भागातील मराठी साहित्याची ओळख करून दिली. पुण्याच्या मृणालिनी गडकरी आणि शांतिनिकेतन येथील प्रा.वीणा अलासे यांनी आपले मत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात सूर्यकांत कुळकर्णी म्हणाले की, उत्तर प्रदेशातील लखनौ, कानपूर, अयोध्या तसेच राजस्थान व गुजरात या भागांतील मराठी साहित्याची दखल घेणे आवश्यक आहे.

तिसरे चर्चासत्र हैदराबादचे साहित्यिक द.पं.जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, गोवा या राज्यांतील मराठी साहित्यावर कर्नाटक-गुलबर्गा येथील भालचंद्र शिंदे, धनश्री हळबे, गोवा येथील प्रा. गोपाळ मयेकर यांनी निबंधवाचन केले. अनंत मनोहर आणि भालचंद्र शिंदे यांनी कर्नाटकातील मराठी साहित्यावर प्रकाश टाकला. आज कर्नाटकात हस्तलिखित १३०० ग्रंथ आहेत. त्यांचे अध्ययन व परिशीलन होणे आवश्यक आहे. दत्तभक्तांना 'गुरुचरित्र'हा प्रासादिक ग्रंथ कर्नाटकानेच दिलेला आहे. तर केरळ व तामिळनाडू येथील मराठी साहित्यावर धनश्री हळबे यांनी प्रकाश टाकला. केरळ व तामिळनाडू हे दोन्ही भूभाग भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्राशी कुठेही जोडलेले नसूनही या दोन्ही विभागांतील मराठी संस्कृती, भाषा आणि वाङमय यांचा प्रभाव महाराष्ट्र संस्कृतीच्या उदयकाळापासून आढळून येतो. मराठीचे तीर्थक्षेत्र म्हणजे तंजावरचा सरस्वती महाल हा याच प्रांतात आहे. येथील मराठी भाषा व संस्कृती टिकवणे हे महाराष्ट्रीयांचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन हळबे यांनी केले. डॉ. गोपाळ मयेकरांनी गोवा राज्यातील मराठी साहित्याचे दर्शन घडवून दिले. आपल्या अध्यक्षीय भाषणात द.पं.जोशी यांनी समर्थांच्या कर्नाटकातील कार्याचा 'दासविश्रामधाम'नावाचा प्रचंड ग्रंथ साक्षी असून त्याचे अध्ययन करणे आवश्यक आहे असा विचार मांडला.

चौथ्या सत्रात 'विदेशातील मराठी साहित्य' यावर प्रसिद्ध लेखक सुभाष भेंडे आणि निरंजन उजगरे यांनी निबंध सादर केले. विदेशात स्थायिक झालेल्या व्यक्तींनी मराठी साहित्याचा वारसा सोडला नाही. आजही 'एकता', 'रंगदीप', 'स्नेह' यासारख्री मासिके प्रकाशित होत आहेत. काही लेखकांचे कथासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत. मागल्या पिढीने मराठी जोपासली. पण नवी पिढी मात्र साहित्यनिर्मिती करण्याइतपत मराठी भाषेशी एकरूप झालेली नाही असा विचार सुभाष भेंडे यांनी मांडला. निरंजन उजगरे म्हणाले, ''कवितेच्या क्षेत्रात मात्र विदेशी मराठी साहित्य खूपच मागे आहे. तथापि कथासाहित्याचा शोध घेता तेथील मराठी साहित्य खूपशा मोकळेपणानं, दोषांचा खुलेपणानं स्वीकार करून, इतर समाजांशी आत्मीयता बाळगून लिहिलंय असं वाटतं.''

चर्चासत्राचे अंतिम सत्र डॉ.गोपाळ मयेकर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. विषय होता

'मराठी भाषा : काल, आज व उद्या'. चंद्रशेखर जहागिरदारांनी ज्ञानेश्वरांपासून आजपर्यंतच्या मराठी भाषेचा व त्यातील स्थित्यंतराचा आढावा घेऊन, मराठी वाचकांची जाणीव संकुचित होत आहे असे मत मांडले. तर रामदास भटकळ म्हणाले की, प्रत्येक क्षेत्रात, समाजात वाचकवर्ग वेगळा असतो. त्यावर साहित्यकृती अवलंबून असते. मराठी साहित्याचे अनुवाद इतर भाषांतून झाल्यास मराठी साहित्याची ओळख अन्य समाजांना अधिक चांगली होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात डॉ.मयेकर म्हणाले, ''एक लक्षात असू द्या की आपली भाषा शुद्ध असावी. परभाषेचा वापर अधिक केला की आपली भाषा दरिद्री होते. तेव्हा भाषा जपणे आवश्यक आहे. आपली मराठी भाषा जगाच्या तोडीची बनणे आवश्यक आहे. तिचे अस्तित्व टिकवणे हे आमचे कर्तव्य आहे, उत्तरदायित्व आहे. स्वभाषेतून व्यक्तिमत्त्व फुलतं.''

समारोपाचे भाषण करताना भालचंद्र नेमाडे म्हणाले की, युरोपीय भाषांप्रमाणे आपल्या भारतात भाषीय द्वंद्व नाही जो एकच भाषा शिकतो त्याची भाषा समृद्ध होते. स्वभाषेतून मिळणारे ज्ञान सकस ठरते. नवीन तंत्र-प्रतिमांतून साहित्य निर्मिती होऊ शकेल असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

डॉ. केशव कान्हेरे (लोकसत्ता)

### 'प्रसारमाध्यमांनी स्त्रीचे व्यक्ती म्हणून दर्शन घडवावे'

माध्यमातून घडणारे स्त्रीचे दर्शन हे स्त्रीत्वाचा विचार करूनच केले जाते. त्याऐवजी एक व्यक्ती म्हणून स्त्रीचा विचार करून प्रसारमाध्यमांनी दर्शन घडवावे, असा सूर 'माध्यमातून सामोरी येणारी स्त्री' या विषयावरील परिसंवादात व्यक्त करण्यात आला. 'सकाळ'च्या सरव्यवस्थापिका विजया पाटील, कवयित्री डॉ. अरुणा ढेरे, डॉ. अश्विनी धोंगडे, साप्ताहिक 'चित्रलेखा'चे संपादक ज्ञानेश महाराव आणि जगदीश पाटणकर त्यात सहभागी झाले होते.

माध्यमांवर वाचकांचे आणि दर्शकांचे नियंत्रण नाही असे सांगून डॉ. धोंगडे म्हणाल्या की, माध्यमांनी दिलेला छुपा संदेश आपण नकळत स्वीकारतो. प्रामुख्याने विनोदाचे माध्यम म्हणूनच महिलांचा विचार केला जातो.

माध्यमातून जाणूनबुजून स्त्रीचे खच्चीकरण होत नाही याकडे जगदीश बापट आणि श्रीरंग गोडबोले यांनी लक्ष वेधले. माध्यमातील माणूस काय हवे याचा विचार करतो. मात्र, काय असायला हवे हे आपण ठरवायचे असते.

शील, चौकट आणि परंपरेत स्त्रीला अडकवून दुसऱ्या बाजूला बाजारूपणा दाखविण्याचा प्रयत्न झाला. माणूस म्हणून स्त्रीचा विचार केला पाहिजे, अशी अपेक्षा ज्ञानेश महाराव यांनी व्यक्त केली. पुरुषांनी रंगविलेली स्त्री त्यांना हवी तशी असते. लेखिकांच्या साहित्यात उमटणारी स्त्री प्रतिमा परस्परभिन्न आहे याचा आपण विचार करीत नाही, असे सांगून डॉ.अरुणा ढेरे म्हणाल्या की, पुरुषविरोधी अशा स्त्रीची भूमिका कधीच नव्हती. पुरुषाच्या सहकार्याने वाटचाल करायची, याची तिला जाणीव आहे.

### राजकीय पातळीवरच दहशतवाद निपटून काढावा

कोणताही दहशतवाद मोडून काढण्यासाठी युद्ध हा पर्याय नाही. दहशतवाद हा राजकीय



प्रश्न असल्यामुळे तो राजकीय पातळीवरच हाताळणे योग्य होईल असे प्रतिपादन नाटककार डॉ.गो.पु.देशपांडे यांनी केले.

पत्रकार प्रकाश बाळ यांच्या 'अफगाण : संस्कृती संघर्ष की तेलासाठी लढा' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. देशपांडे यांच्या हस्ते सातारा येथील नगरवाचनालयाच्या पाठक हॉलमध्ये करण्यात आले. डॉ. देशपांडे म्हणाले, दहशतवाद हा निव्वळ प्रतिगामी, पुरोगामी अथवा आधुनिक नसतो तर तो व्यामिश्र असतो. अमेरिकेला अफगाणिस्तानमधला दहशतवाद संपवता येईल असे मानणे ही फसगत होईल. गेल्या ५० वर्षात अमेरिकेने लादलेल्या साम्राज्यवादाच्या गुलामगिरीतूनच लादेन पुढे आला हे समजून घेतले नाही तर नवीन लादेन निर्माण होतील. मूलतत्ववादाकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा हा परिणाम आहे. अमेरिकन संस्कृतीस मान्य तेच जगाने मान्य करावे असे म्हणणे हा अमेरिकेचा आंतरराष्ट्रीय दहशतवादच आहे.

पाकिस्तान आणि दहशतवाद याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे असे सांगून डॉ. देशपांडे म्हणाले, पाकिस्तानी नेतृत्वावर आपण अन्याय करतो. पाकिस्तानचे अध्यक्ष मुशर्रफ यांचे भाषण ऐतिहासिक महत्त्वाचे आहे. आधुनिकतेकडे वळणारा इस्लाम त्यांना तयार करायचा आहे. त्यांच्या या भूमिकेचे आणि या घटनेचे आपण स्वागत केलेले नाही. पाकिस्तानात आधुनिकता नाकारणारा वर्ग हवा, असे मानणारे आहेत. भारतात सध्या केंद्रस्थानी आधुनिकता नको असणाऱ्यांचेच राज्य आहे. फाळणीचा निर्णय चुकीचा असल्याचा पश्चात्ताप व्यक्त करणारे जीना यांनी केलेले भाषणंही ऐतिहासिक महत्त्वाचे होते. आता मुशर्रफ मनाची घडण वेगळी करा असे म्हणत आहेत. ते घेत असलेल्या या आधुनिक नवीन दृष्टिकोनाचे स्वागत झाले पाहिजे. पण हे होताना दिसत नाही. अलग पडण्याची (आयसोलेशनची) भारताला भीती वाटते.

जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद संपावा अशी भारतातील सर्वांची इच्छा आहे. बोलणी करूनच तडजोड करावी लागेल. हा प्रश्न संपला असे गृहीत धरून तो संपणार नाही याचे भान बाळगण्याची गरज आहे असे सांगून डॉ. देशपांडे म्हणाले, मूलतत्त्ववाद, दहशतवाद, कट्टरवादी यांना डोके नाही, नुसते हातच आहेत असे समजणे चूक आहे. मुस्लिम दहशतवाद हा अलिकडील वीस पंचवीस वर्षात लादण्यात आलेल्या मागसलेपणातून उफाळून आलेला आहे. हा साम्राज्यवाद समजावून घेऊन राजकीय पातळीवरच तो हाताळावा लागेल युद्धाने दहशतवाद संपणार नाही. अफगाणिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर दहशतवादाचं स्वरूप स्पष्ट करणारे विश्लेषण प्रकाश बाळ यांनी केले आहे.

प्रकाश बाळ आपल्या भाषणात म्हणाले, दहशतवाद लढ्याबाबत आपली भूमिका पाकिस्तानच्या संदर्भात लावली जाते. जागतिकीकरणाच्या युगात बाजारपेठ मिळविण्याच्या हेतूने स्वत:च्या हिताचा विचार अमेरिका ही करीत आहे. नवीन बदललेल्या संदर्भात आशिया खंडातील स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र म्हणून वेगळा दबाव गट करण्याची गरज होती. मात्र इस्लाम दहशतवाद जिहादच्या नावाखाली 'अमेरिकेला पाठिंबा देण्यात धन्यता मानतो. जागतिक बाजार पेठेत बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या दृष्टीने भारत व चीन हे देश मोठ्या बाजारपेठा आहेत. या सामर्थ्यांचा उपयोग देशाच्या संरक्षणासाठी करून घेतला पाहिजे.'

### भारतीय समाजव्यस्थेत वस्ती आणि जात एकजीव

आपल्या भारतीय समाजव्यवस्थेत वस्ती आणि जात या दोन गोष्टी इतक्या एकजीव झाल्या आहेत, की वस्तीचा संदर्भ दिला, जर त्यात राहणाऱ्या समाजसमूहाची जात कोणती हे

सांगण्याची आवश्यकता भासत नाही. असे परखड विचार मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी मांडले.

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात आयोजित वसंत मून यांच्या 'ग्रोइंग अप अनटचेबल इन इंडिया' या इंग्रजी आत्मचरित्राचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले.

वसंत मून यांच्या 'वस्ती'या मूळ मराठीतील आत्मचरित्राचा गेल ऑमवेट 'ग्रोइंग अप अनटचेबल इन इंडिया' या नावाने अनुवादित केला आहे. साहित्य लेखनाच्या माध्यमातून मून यांनी आंबेडकरी चळवळीमध्ये मोठे योगदान दिले आहे, असा सर्वच वक्त्यांनी गौरव केला.

श्री. मुगणेकर म्हणाले, ''दलित साहित्य किंवा ज्याला अलिकडे फुले-आंबेडकरी साहित्य म्हटले जाते, त्यातील कथा असो किंवा कादंबरी असो, त्या कलाकृतीमधील नायक किंवा नायिका हा त्या कलाकृतीचा लेखक किंवा लेखिका यांचा आविष्कार असतो. वेगवेगळ्या पात्रांच्या रूपातही लेखकाच्या स्वभावाचे दर्शनही त्यात घडते. 'वस्ती' या आत्मचरित्रामध्ये मून यांचे जीवन आविष्कृत झाले आहे. मात्र, मून यांचे बालपण, तरुणपण त्या 'वस्ती'सह अंतिमत: आंबेडकरी चळवळीत विसर्जित होते, या अर्थाने या पुस्तकाचे मोल अधिक आहे. या आत्मचरित्रातून मून यांची बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर व चळवळीवर अपार निष्ठा आहे, याचेही दर्शन आपणास घडते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अप्रकाशित लेखन प्रकाशित करण्याचे मून यांचे कार्य अजोड आहे. बाबासाहेबांचे विचार व्यापक स्वरूपात लोकांपर्यंत पोचविण्याचे ऐतिहासिक काम त्यांनी केले आहे. एका अर्थाने आंबेडकरी चळवळीतील त्यांचे हे योगदानही अतुलनीय आहे.''अशा शब्दांत मून यांच्या कार्याचा श्री. मुगणेकर यांनी गौरव केला आहे.

एलिनार झेलियट, गेल ऑमवेट, कुमुद पावडे, दिनकर गांगल यांचीही भाषणे झाली. राजा ढाले, प्रा.अरुण कांबळे, ज.वि.पवार, मीनाक्षी मून, वामनराव होवाळ इत्यादी आंबेडकरी चळवळीतील मंडळीही उपस्थित होती.

### बौद्ध संत साहित्याचे मराठीत भाषांतर करण्याची गरज

बौद्ध संत साहित्याचे मराठीत भाषांतर करून नवबौद्धांसाठी त्याचे दालन खुले व्हावे या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे मत ज्येष्ठ विचारवंत डॉ.मा.गो.धडफळे यांनी पुणे येथे व्यक्त केले. डॉ. रा.श.वाळिंबे स्मृतिव्याख्यानमालेत 'संत साहित्याच्या तौलनिक अभ्यासाची नवी दिशा' या विषयावर ते बोलत होते.

मराठी भाषेतील उपलब्ध असलेल्या बौद्ध संत साहित्याचा ज्या प्रमाणात विकास होणे आवश्यक होते त्या प्रमाणात विकास न झाल्याने मराठी संत साहित्य हे बौद्ध संत साहित्यातील मौलिक ज्ञानापासून वंचित राहिले आहे. बौद्धांचे संत साहित्य मराठीत रूपांतरित केल्यामुळे मराठी भाषेच्या समृद्धीत भर पडेल व बौद्ध साहित्याचे लेणेही मराठीला प्राप्त होईल, असेही डॉ. धडफळे यांनी सांगितले.

बौद्ध साहित्य पाली भाषेत असल्यामुळे मराठीत ते भाषांतरित करताना भाषांतरकाराला पालीचे ज्ञान व अभंग, ओवी या काव्यप्रकारांची उत्तम जाण असणे आवश्यक आहे, असे सांगून ते म्हणाले की, दुर्दैवाने मराठीत अशा दोन्ही क्षमता असणारे फार कमी अभ्यासक आहेत.मराठी संत साहित्य व बौद्ध संत साहित्य या दोन्हींचा तौलनिक अभ्यास करताना



त्यामधील अनेक साम्यस्थळे जशी लक्षात येतात तशीच त्यातील भेद स्थळेही सहज दिसून येतात. असे सांगून ते म्हणाले की, निसर्गातील प्रतिमा व प्रतीक यांचा चपखल वापर करून अध्यात्माचे अनुभवकथन थेरगाथेत करण्यात आले आहे.

बौद्ध संत साहित्यामध्ये निसर्गवर्णनाची विपुलता दिसून येते, परंतु मराठी संतसाहित्यात आवश्यक तितकेच निसर्गवर्णन केल्याचे आढळते असेही त्यांनी सांगितले.

बौद्ध धर्म म्हणजे योगसाधनेचा बृहद् आविष्कार असून बुद्धजीवनात निसर्गाला मोलाचे स्थान असल्यामुळे निसर्गवर्णन थेरगाथेचा अपरिहार्य घटक बनले असावे, असेही ते म्हणाले.

संत साहित्याची तुलना स्पष्ट करण्यासाठी त्यांनी संत रामदास स्वामींच्या दासबोधातील ओव्यांचेही दाखले दिले.

### प्रबोधनकारांचे टपाल तिकीट

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अग्रणी, थोर समाजसेवक, प्रबोधनकार ठाकरे यांच्या नावाने केंद्र सरकार टपाल तिकीट काढणार असल्याची घोषणा माहिती व तंत्रज्ञानमंत्री प्रमोद महाजन यांनी केली. प्रबोधनकारांचा वारसा सवाईपणे चालविणारे हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांना आपण पहिले तिकीट देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. सध्या या तिकिटांच्या छपाईचे काम सुरू आहे.

### हिंदी ही जगात सर्वाधिक बोलली जाणारी भाषा?

जागतिक लोकसंख्येच्या आधारे करण्यात आलेल्या एका पाहणीनुसार जगात हिंदी भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या १ अब्ज १०कोटी इतकी झाली आहे. चिनी भाषा बोलणाऱ्यांची संख्या मात्र १ अब्ज ६ कोटी एवढीच आहे. हिंदीभाषी लोकांपेक्षा चिनीभाषी लोकांची संख्या ४ कोटींनी कमी असल्यामुळे हिंदी ही आता जगातली सर्वाधिक बोलली जाणारी भाषा ठरायला हवी. 'इंडस्ट्रियल बँक ऑफ इंडिया' तर्फे प्रकाशित केल्या जाणाऱ्या 'विकासप्रभा' नावाच्या त्रैमासिक मुखपत्रामध्ये अलिकडेच ही माहिती देण्यात आली आहे. भारतासह जगातल्या ४४ देशांमध्ये हिंदी बोलणारे लोक राहतात आणि त्यांची त्या पाहणीत नोंदवण्यात आलेली नेमकी संख्या १,१०,२९,९६,४४६ इतकी आहे. १९९९ सालचे जागतिक लाकसंख्येचे तपशीलवार आकडे पाहिले तर हिंदीच्या जागतिक स्तरावरच्या दाव्याला पुष्टी मिळते.

तथापि हा दावा सहजासहजी मान्य होणार नाही, असा अंदाज आहे. या दाव्याच्या पुष्ट्यर्थ जे स्पष्टीकरण दिले जाते त्यात पाकिस्तान आणि नेपाळसारख्या देशांमधले ८० टक्के नागरिकही समाविष्ट केलेले असतात. ब्रज, अवधी, भोजपुरी, राजस्थानी यासारख्या देशांतर्गत बोलींचाही हिंदीमध्येच अंतर्भाव केला जातो. तसाच मॉरिशस, सूरीनाम, फिजी, गियाना वगैरे देशांमधील मूळच्या भारतीय वंशाच्या असणाऱ्या लोकांचाही हिंदीभाषी लोकांमध्येच समावेश केला जातो.

पाकिस्तानी 'उर्दू ही स्वतंत्र भाषा आहे आणि तीच पाकिस्तानातील बहुसंख्य लोकांची बोली भाषा आहे', असा मुद्दा मांडून हिंदीला मानाचे स्थान मिळू नये असा प्रयत्न करीत आहे. उर्दू ही स्वतंत्र भाषा कशी या प्रश्नाला उत्तर देताना वेगळी लिपी आणि अरबी-फारसी शब्द

पुराव्यासारखे पुढे करता येत असले तरी तिचे व्याकरण निराळे दाखवता येत नसल्यामुळे पाकिस्तानी आडमुठेपणा कुठल्याही चर्चेत सहज स्पष्ट होतो. शिवाय चिनीभाषी लोकांची संख्या मोजतानाही चीनमधल्या विविध बोलीभाषा गृहीत धरल्या जातातच, विविध बोलीभाषांमध्ये एकाच शब्दाचे वेगवेगळे अर्थ घेतले जात असले आणि आग्नेय आशियामधल्या अन्य देशांमधील चिनीभाषी लोकांची गणती केली जात असताना त्यांच्या व्यवहारातले स्थानिक भाषांचा प्रभाव लक्षात घेऊनही त्यांनी चिनीभाषीच मानले जात असले तरी त्याबद्दल कुणाचा- अगदी पाकिस्तानचाही आक्षेप नाही, मग तेच निकष लावून हिंदी भाषी लोकांची संख्या निश्चित केली जात असेल तर हिंदीचा सन्मान रोखून धरणे कुणालाही शक्य नाही, पाकिस्तानचा हा भाषिक पराभव अटळ आहे!

**लोककलावंत आणि रसिक यांनी एकत्र यायला हवे!**

''लोकनाट्यातील संगीताने संगीत नाटकाला चालना दिली आहे. आज हे संगीत टिकायचे असेल तर लोककलावंत आणि रसिक यांनी एकत्र येण्याची गरज आहे,'' असे प्रतिपादन प्रख्यात कवी व लोककला संशोधक अशोकजी परांजपे यांनी लोककलेवरील राज्यस्तरीय परिषदेचे उद्घाटन करताना काढले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे नाट्यशास्त्र प्रमुख डॉ. रुस्तुम अचलखांब यांनी २१ व २२ फेब्रुवारी रोजी 'लोककला : संकल्पना, स्वरूप आणि प्रायोगिकता' या विषयावर राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन केले. उद्घाटन समारंभाला कुलगुरू के.पी. सोनवणे अध्यक्ष म्हणून तर डॉ. विश्वनाथ शिंदे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

डॉ.रुस्तुम अचलखांब व डॉ.शशिकांत बऱ्हाणपूरकर यांनी तमाशा व लोकरंगभूमी यावर आपले निबंध सादर केले. या प्रसंगी डॉ. अचलखांब यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत तमाशा मूळ स्वरूपात सादर केला. डॉ. चांदजकर यांनी भारुडावर निबंध सादर केला. सिल्लोड तालुक्यातील निरंजन भाकरे आणि मंडळी यांनी भारुडाचे सादरीकरण केले.

दुसऱ्या दिवशी डॉ.विश्वनाथ शिंदे यांनी गोंधळावर निबंध सादर केला व तुकाराम गोंधळी यांनी सादरीकरण केले. प्रकाश खांडगे यांनी जागरण या लाककलेवर निबंध सादर केला व कमलाबाई शिंदे यांनी सादरीकरण केले.

प्रा.फ.मुं.शिंदे परिषदेच्या अध्यक्षस्थानी होते. ते म्हणाले,''लोकसंस्कृतीमध्ये खऱ्या अर्थाने लोकशाही आहे. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आहे. लोककलावंतांनी मोठ्या कष्टाने ही संस्कृती टिकवून ठेवली आहे.'' डॉ.प्रभाकर मांडे म्हणाले, ''भारतीय लोककलेतून भक्तांनी देवतांना आवाहन केले व त्यातूनच नाट्य वाङ्मयाचा उदय झाला आहे.''

**'गजाआडच्या कविता' - प्रकाशन**

अमर्याद बंधनात, आयुष्यभर राहायचे
नयनातील अश्रू, पाण्यास वाहायचे
सांग ईश्वरा सांग, कुठवर भोगायचे
फक्त आणि फक्त, गगनच पहायचे!!



या ओळी लिहिणारा कवी रमेश बाबूराव खाडे सध्या औरंगाबाद मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत आहे.

नियतीचे प्रहार झेलण्यासाठी इथे मनाची मशागत होते
कुणाच्या तरी अलवार आठवणीने, मात्र काळीज सशागत होते

आम्ही असे कंगाल बाजारात पत नाही
हारणेच वाट्याला आले जिंकण्याची जिद्द नाही
चोरीला गेला न चंद्र अशी कधी रात नाही
चांदण्याच काय पण चंद्रचीही धडगत नाही (शिवाजी साळुंके)


२२ कैद्यांनी रचलेल्या कवितांच्या संग्रहाचे प्रकाशन प्रख्यात कवी नारायण सुर्वे यांच्या हस्ते नाशिक येथील मध्यवर्ती कारागृहात संपन्न झाले. सकाळ (नाशिक) चे संपादक उत्तम कांबळे हेही उपस्थित होते.

अनेक कैद्यांनी या मंचाद्वारे आपल्या वेदना, पश्चात्ताप, सामाजिक व राजकीय व्यवस्थेतील चुका, त्यांच्या जीवनातील अंधार व गावाची किंवा आईची येणारी आठवण अशा अनेक गोष्टींना मोकळी वाट करून दिली आहे.

**वाराणसीच्या विश्वराध्य मठातर्फे 'डॉ. चंद्रशेखर कपाळे पुरस्कार'**

श्री. जगद्गुरु विश्वराध्य ज्ञानसिंहासन जंगमवाडी मठ, वाराणसी यांच्यातर्फे या वर्षीपासून 'डॉ चंद्रशेखर कपाळे साहित्य पुरस्कार' देण्यात येणार आहे. अभय चंद्रशेखर कपाळे यांनी आपल्या वडिलांच्या नावाने पुरस्कार देण्यासाठी काशी पीठाला एक लक्ष रुपयांची देणगी दिली असून, या रकमेच्या व्याजातून दरवर्षी दहा हजार रुपयांचा पुरस्कार वीरशैव धर्म, तत्त्वज्ञान, इतिहास या विषयावरील उत्कृष्ट ग्रंथास दिला जाणार आहे. पुरस्काराचे हे पहिले वर्ष असल्यामुळे १ जानेवारी १९९९ ते ३१ डिसेंबर, २००० या काळात प्रकाशित झालेले ग्रंथ पुरस्कारासाठी पात्र ठरतील. पत्ता- रे.रा. मगाई, ३ अ, अध्यापक नगर, विजापूर रोड, सोलापूर. दूरध्वनी- ३४१५९४ लेखकांनी ग्रंथाच्या दोन प्रती ३० एप्रिल, २००२ पर्यंत पाहोचतील, अशा रीतीने पाठवाव्यात.

वीरशैव धर्म, तत्त्वज्ञान, इतिहास वाङ्मय अशा विषयांवरील ग्रंथ असावेत, कोणत्याही भारतीय भाषेतील ग्रंथास पुरस्कार देण्यात येईल; परंतु मराठी भाषेतील ग्रंथास प्राधान्य देण्यात येईल. पीएच.डी. व डी. लिट् पदव्यांसाठी सादर केलेले प्रबंध स्वीकारले जातील. मात्र ते प्रकाशित झालेले असावेत. वीरशैव वाङ्मयातील संपादित ग्रंथ, वीरशैव वाङ्मयावरील संशोधनपर ग्रंथ तसेच अनुवादित ग्रंथ, ललित ग्रंथ पुरस्कारार्थ निवड करण्यासाठी प.पू. श्री.काशी जगद्गुरू डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी तज्ज्ञांची नियुक्ती करतील आणि त्यांच्या विचाराने पुरस्कार घोषित करतील. या वर्षीचा पहिला पुरस्कार सोलापूर येथे जुलै २००२ मध्ये देण्यात येणार आहे.




## मेहता फाउंडेशनचे पुरस्कार जाहीर

मेहता पब्लिशिंग हाऊस फाऊंडेशनतर्फे दरवर्षी 'स्वामी'कार रणजित देसाई पुरस्कार देण्यात येतात. २००१ सालातील पुरस्कार जाहीर झाले आहेत.

**प्रथम पुरस्कार : (रु.६०००)** दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा-कोल्हापूर (**वाङ्मयीन कार्यासाठी**),

**द्वितीय पुरस्कार :** (रु.५०००) डॉ. कुमार सप्तर्षी **(येरवडा विद्यापीठातील दिवस),**

**तृतीय पुरस्कार :** (**रु.**५०००) अंजनी नरवणे **(गहाण पडलेली टेकडी)**

पुरस्कार प्रदानसमारंभ रणजित देसाई जयंतीदिनी, ८ एप्रिल, २००२ रोजी सायंकाळी ६ वाजता कोल्हापूर येथे राजर्षी शाहू स्मारक भवनात संपन्न झाला. मेहता पब्लिशिंग हाऊस फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. आनंद यादव यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

अशी माहिती मेहता पब्लिशिंग हाऊस फाऊंडेशनचे श्री. अनिल मेहता यांनी दिली.

## 'आठवणींच्या मोहर'ला रेगे पुरस्कार

ठाण्यातील प्रख्यात वकील डॉ. प्र. वा. रेगे यांनी आपले वडील वामन अनंत रेगे स्मृतीप्रीत्यर्थ दिलेल्या देणगीतून दरवर्षी ठाणे जिल्ह्यातील उत्कृष्ट साहित्य कलाकृतीस रोख रक्कम व शाल श्रीफळ असा पुरस्कार समारंभपूर्वक मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे तर्फे दिला जातो. सन २०००-२००१ चा हा पुरस्कार मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या व श्री. राजाभाऊ गवांदे यांनी लिहिलेल्या 'आठवणींचा मोहर' या पुस्तकास देण्यात आला.

सदर पुरस्कार डॉ. आनंद यादव यांच्या हस्ते २६ मार्च, २००२ रोजी ठाणे येथे प्रदान करण्यात आला.

## के.रं. शिरवाडकर यांना पुरस्कार

आपल्या कवितेला सामाजिक परिमाण दिल्याने कुसुमाग्रजांची कविता चैतन्यमय व सामर्थ्यशाली बनली, असे मत कुसुमाग्रजांचे धाकटे बंधू, ज्येष्ठ समीक्षक के.रं.शिरवाडकर यांनी व्यक्त केले.

शिरवाडकर यांनी कुसुमाग्रजांवर ज्यांनी लिहिलेल्या 'तो प्रवास सुंदर होता'या ग्रंथासाठी प्रसादबन वाङ्मय पुरस्कार देण्यात आला. पाच हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. ताराबाई परांजपे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.



शिरवाडकर म्हणाले की, केवळ आस्वादक समीक्षा करणे मला कधीच आवडत नाही. ज्या कवींच्या कवितांची समीक्षा करायची त्यास देव मानायचे नसते किंवा त्याच्या कवितेवर निष्कारण ओरखडेही ओढायचे नसतात. हे संतुलन राखण्याचा प्रयत्न मी 'तो प्रवास सुंदर होता' या ग्रंथात केला आहे, असे त्यांनी सांगितले.

## निजामखान यांची कविता जागतिक पातळीवर

पुणे येथील शाकीर निजाम खान यांची 'व्हाय शूड आय प्रे टू डाय' ही कविता जागतिक पातळीवरील स्पर्धेत उपांत्य फेरीला पात्र ठरली आहे.

इंटरनॅशनल लायब्ररी ऑफ पोएट्री व पोएट्री डॉट कॉमतर्फे ही स्पर्धा आयोजित केली जाते. स्पर्धेनंतर निवडक कवितांचा संग्रह 'लेटर्स फ्रॉम सोल' या नावाने प्रकाशित केला जाणार आहे, असे पोएट्री डॉट कॉमचे व्यवस्थापकीय संपादक हावर्ट इले यांनी एका पत्रान्वये कळविले आहे.

शाकीर खान यांचा ऑटो कन्सल्टंट हा व्यवसाय आहे. यापूर्वीही त्यांची कविता जागतिक पातळीवर गाजली होती.

## चंद्रकांत पाटगावकर यांना 'साने गुरुजी' पुरस्कार

अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेतर्फे दरवर्षी दिला जाणारा ''साने गुरुजी पुरस्कार'' प्रा. चंद्रकांत पाटगावकर यांना साक्री (जि. धुळे) येथे कथामालेच्या वार्षिक अधिवेशनात देण्यात आला.

माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, मधुकरराव चौधरी व डॉ.सुलभा शाह यांच्या निवड समितीने हा निर्णय घेतला.

प्रा. पाटगावकर यांना यापूर्वी महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक राज्य पुरस्कार, आचार्यकुल नागपूरचा पुरस्कार व मालती शामराव पाटील, कोल्हापूर पुरस्कार मिळालेला आहे. १९८४ साली सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा प्रदेशातील ७२२ शाळा-कॉलेजातील तीन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांपुढे डॉ.नेल्सन मंडेला, महात्मा फुले, गांधी आणि सानेगुरुजी यांची जीवनचरित्रे कथन केली आहेत.

लोकनायक जयप्रकाश नारायण जन्मशताब्दीनिमित्त एक लाख विद्यार्थ्यांना त्यांचे जीवन व विचार कथन करण्याचा त्यांनी संकल्प केला असून, आतापर्यंत तेहतीस हजार विद्यार्थी संख्येचा टप्पा त्यांनी पार केला आहे.

स्वातंत्र्यसैनिकांसाठीचा एस.टी.चा मोफत पास असल्याने कोणत्याही शाळाकॉलेजकडून प्रवासखर्च अथवा मानधन स्वत:साठी न स्वीकारता हे विद्यार्थी प्रबोधनाचे व्रत या उतारवयातही न थकता आचरणात आणून त्यांनी सेवानिवृत्तांपुढे समाजसेवेचा एक आदर्श ठेवला आहे.

## कृषिग्रंथांना पुरस्कार जाहीर

बळीराजा मासिकातर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांमध्ये डॉ. राहुडकर मराठी कृषिग्रंथ उत्तेजक पुरस्कारांपैकी प्रथम पुरस्कार वासुदेव काठे यांच्या 'दर्जेदार द्राक्ष उत्पादनाची प्रयोगसिद्ध मूलतत्त्वे',

द्वितीय पुरस्कार डॉ. मुकुंद गायकवाड यांच्या 'जागतिकीकरण - शाप नव्हे वरदान' आणि तृतीय पुरस्कार डॉ.जे.ए. पाटील यांच्या 'बीजोत्पादन' आणि डॉ. वा.द. वर्तक यांच्या 'ताडामाडाची पामसृष्टी' पुस्तकास विभागून देण्यात आला आहे.

## अशोक कामत यांना 'चन्नबसव पुरस्कार'

पुणे विद्यापीठातील संत नामदेव अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. अशोक कामत यांना या वर्षीचा 'चन्नबसव पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. कर्नाटकमधील वीरशैव हिरेमठ संस्थानच्या बसवधर्म प्रतिष्ठानतर्फे हा पुरस्कार देण्यात येतो. पाच हजार रुपये आणि प्रशस्तिपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ. कामत यांनी बसवेश्वर यांचे जीवनचरित्र आणि तत्त्वज्ञान यावर ग्रंथ प्रकाशित केला. वीरशैवपंथीय मराठी वाङ्मयाविषयी अनेक शोधनिबंध लिहिले.

## पामेला स्टिफन्सनला 'बुक ऑफ द इयर' पुरस्कार

सध्या लॉस एन्जलिसमध्ये मानसोपचारतज्ज्ञ म्हणून काम करणाऱ्या परंतु बीबीसी टीव्हीच्या तमाम प्रेक्षकांना 'नॉट द नाईन ओ क्लॉक न्यूज'या कार्यक्रमामुळे सुपरिचित असलेल्या पामेला स्टिफन्सन यांच्या 'बिली'या पुस्तकाला यंदाचा सर्वोत्कृष्ट पुस्तकाचा पुरस्कार लाभला आहे. प्रख्यात विनोदवीर बिली कॉनेली यांचे चरित्र या पुस्तकात आहे.

स्वत: शो बिझिनसमध्ये बसलेल्या पामेलाने मानसशास्त्रात डॉक्टरेट मिळविण्यासाठी अभ्यास केला. या पुस्तकात अत्यंत प्रतिभावंत परंतु, खासगी आयुष्यात खूप क्लेशकारक अनुभवातून जावे लागलेल्या बिली कॉनेलीचे चरित्र आहे. लहानपणी आईने टाकून दिल्यानंतर आत्यांनी केलेली मारहाण आणि छळ, त्यावर कळस म्हणून खुद्द त्याच्या वडिलांनीच केलेले लैंगिक अत्याचार... तरीही मोठेपणी विनोदवीरपर्यंतचा प्रवास विलक्षण आहे. गेल्या ऑक्टोबरमध्ये प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकाच्या आतापर्यंत चार लाखांहून अधिक प्रती खपल्या आहेत.

या पुरस्कारासाठी त्यांची स्पर्धा होती बेरिल बेनब्रिज यांच्या 'अकॉर्डिंग टू क्वीनी' या पुस्तकाशी. यावेळी ऑथर ऑफ द इयर पुरस्कार फिलिप पुलमन यांना देण्यात आला. लहान मुलांसाठी त्यांनी लिहिलेल्या 'द एम्बर स्पायग्लास'या कादंबरीसाठी त्यांची निवड झाली. त्यांनी जी.के. रॉलिंग आणि इयान मॅकइवान यांना मागे टाकून हा पुरस्कार पटकावला.

## आत्मविश्वासामुळे मराठी कविता फुलतच राहील

कवितेच्या अलौकिकत्वाबद्दल आत्मविश्वास असणाऱ्या कवींच्या निर्मितीमुळे कविता फुलतच राहणार आहे, असे मत कवी हेमंत जोगळेकर यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने श्रीकृष्ण राऊत यांच्या 'एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर जन्म घेणाऱ्या मुला' या काव्यसंग्रहास 'महाराष्ट्र कवी यशवंत पुरस्कार' प्रदान करण्यात (एक हजार रुपये)



एकविसाव्या शतकाचा कालखंड हा नव्या प्रतिभेच्या कवींचा असेल, १९३५ पर्यंत कवी यशवंत यांच्यासह रविकिरण मंडळांची मराठी कवितेवर छाप होती. १९४५ पासून मर्ढेकरी परंपरा सुरू झाली. साठोत्तरी कवितेच्या कालखंडात कविता व्यापक झाली. आता नवकविता फुलत आहे. कवितेच्या अलौकिकतवाबद्दल आत्मविश्वास असणाऱ्या कवींच्या निर्मितीमुळे कविता समृद्ध होत राहील.

## तेरणीकर, देव, श्रॉफ, पाटील यांना कर्तृत्व गौरव पुरस्कार

आपल्या कर्तृत्वामुळे विविध क्षेत्रांत ठसा उमटविणाऱ्या सुलभा तेरणीकर, डॉ. वीणा देव, साधना श्रॉफ, विजया पाटील यांचा जागतिक महिला दिनानिमित्त 'कर्तृत्व गौरव पुरस्कार'देऊन गौरव करण्यात आला.

कोथरुड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात ज्येष्ठ अभिनेत्री जयमाला शिलेदार यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. 'सखी काव्यमयी' हा काव्यरूपी आाविष्कारही या प्रसंगी सादर करण्यात आला. संजीवनी बोकील, आसावरी काकडे, संगीता जोशी, प्राची जोशी, ज्योत्स्ना चांदगुडे यांचा त्यामध्ये सहभाग होता. सुलभा तेरणीकर यांनी अठराहून अधिक वर्षे संगीतविषयक लेखन केले आहे. प्रा.डॉ. देव या शाहू महाविद्यालयामध्ये मराठी विभागाच्या प्रमुख असून त्यांनी साहित्यविषयक लेखन बरेच केले आहे.


## स्वयंपाक घरातील नवा मित्र मायक्रोवेव्ह ओव्हन

अन्नपूर्णा या पाकक्रियांच्या पुस्तकामुळे गाजलेल्या मंगला बर्वे यांच्या कन्या **राजश्री नवरे** यांनीही आईचा वारसा पुढे चालवण्याचा निश्चय करून मायक्रोवेव्ह कुकिंगची माहिती देणारे मायक्रोवेव्ह ओव्हन हे पुस्तक तयार केले आहे. लग्नानंतर यजमानांच्या परदेशातील नोकरीमुळे देश-परदेशात भरपूर प्रवास झाला आणि त्यामुळे मायक्रोवेव्हच्या वेगळ्याच दुनियेत भरपूर हायफाय प्रयोग करता आले; आणि चवीने खाण्यापिण्याची चटक लागली. मायक्रोवेव्ह कुकिंग हे केवळ हायफाय वर्गासाठीच असते, हा भ्रम दूर व्हावा, सर्वसामान्य कुटुंबालाही त्याचा नानाप्रकारे लाभ होऊ शकतो असे त्यांना वाटते. 'मायक्रोवेव्ह'मुळे वेळ वाचतो. पदार्थातील अन्नसत्वे कायम राहतात, सुरक्षितता वाटते, वीजेची बचत होते. सूप्स, चटण्या, कोशिंबिरी, स्नॅक्स (ढोकळा, सुरळीच्या वड्या, उपमा, पोहे, आम्लेट, पिझ्झा, साबुदाणा खिचडी) भाताचे प्रकार (जिरा राईस, पुलाव, खिचडी, पिलाफ, मशरूम काबुली चणे पुलाव, चिकन बिर्याणी, अननस भात), भाज्या (मखानी पनीर, मसालेदार भेंडी, जालफ्रेजी, भोपळी मिरचीचे कायरस, वालाचे बिरडे, सुखे आलू, आलू गोभी), सार, डाळ, कढी, गोड पदार्थ, (बासुंदी, मोदक, गाजर हलवा, स्पाँज पुडिंग, क्रीमी कॅरेमल, ड्रायफ्रुट खीर) वगैरे प्रकारच्या डिशेस करण्याची माहितीही या पुस्तकात आहे. त्यामुळे मायक्रोवेव्ह ओव्हन घरी असावा असे प्रत्येक सुगरणीला वाटेल.


**किंमत : ७० रु. सवलतीत : ६० रु.**

**सभासदांना : ५३ रु. पोस्टेज : २० रु.**

पुस्तक परिचय

# सुवर्णमुद्रा

## शान्ता शेळके




## विविध विषयांवरील चिंतनगर्भ अवलोकने

शांताबाई शेळके यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू आहेत. मधुकर वृत्तीने कणाकणाने ज्ञानसंचय करण्यातील त्यांचा उत्साह साठीनंतरच्या काळातही अविरत अप्रतिहत चालूच आहे. शाळकरी वयात त्या आपल्याला आवडलेले सुविचार, सुभाषिते, विनोद, गमतीदार माहिती, काव्यपंक्ती वगैरे टिपणवहीत लिहून ठेवत. पुढे संस्कृत, इंग्लिश साहित्याशी परिचय घडला. त्यातीलही नवलाईचा खजिना त्या आपल्या टिपणवहीत आणू लागल्या.

मधमाशी जशी फुलाफुलांवर उड्या मारून कणाकणाने मधुर मध गोळा करते, तद्वतच शांताबाईंचे सुंदर वचनांचे संकलन चालू असते. त्या वचनांमधील अर्थगांभीर्याने त्या भावविभोर होतात. त्याचा स्वत:शीच पुन:पुन्हा आस्वाद घेतात.

वेळोवेळी जमवलेल्या या सुविचारवजा पंक्ती म्हणजे त्यांना सुवर्णमुद्रा वाटतात आणि त्या सुवर्णमुद्रांची झळाळी आपल्या मित्रमंडळींना दाखवण्याची त्यांची उर्मी उफाळून येते. त्यातून मधुसंचय, सुवर्णमुद्रा यासारखी संकलने वाचकांसमोर अवतरतात.

'सुवर्णमुद्रा'मध्ये चारपाचशे मुद्रांचा समावेश आहे. त्या सर्वच सर्वांना बावनकशी वाटतील असे नाही; परंतु वीसबावीस कॅरटची तरी शुद्धता त्यात नक्कीच जाणवेल. या सुवर्णमुद्रा मूळ कुठल्या भांडारातून घेतल्या आहेत तेही शक्य तेथे नमूद केले आहे.

रामायण-महाभारत, वेदउपनिषदे ही भांडारे त्यांनी तूर्त बाजूला ठेवलेली असली तरी जपानी, चिनी, फ्रेंच म्हणी, सेनेकासारखे ग्रीक-रोमन योद्धे, ज्ञानेश्वर-तुकाराम-नामदेव-रामदास आदी संत, शंकराचार्य, कबीर, विवेकानंद, फादर स्टिफन्स वगैरे संतमहात्मे त्यांना प्रिय आहेत.

पाश्चात्य लेखकांमधील व्हिक्टर ह्युगो, टॉमस रीड, कान्ट, ऑस्कर वाइल्ड, शेक्सपियर, जॉर्ज इलियट, सॉमरसेट मॉम, मार्क ट्वेन, मार्टिन ल्युथर किंग, जॉन्सन, स्पेन्सर, बर्ट्रँड रसेल,



### पुस्तकाची खास वैशिष्ट्ये...

- रसिक, चोखंदळ अशा लेखिकेला संग्राह्य वाटलेल्या सुविचारांचे संकलन.
- विविध विषयांवरील मार्मिक निरीक्षणे.
- कुठलेही पान उघडून वाचायला लागावे.
- एका पाठोपाठ एक पान कसे आपण वाचतच राहतो याचाच विसर पडतो.
- विनोद, सुभाषिते,निरनिराळे लेखक व विचारवंत यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान यांची मेजवानी.

अँड्र्यू कार्नेजी, ओ हेन्री, अब्राहम लिंकन, ट्रमर्सन, थोरो, मायकेल अँजेलो, जेम्स बॅरी, लुइझा अलकॉट, बाल्झॅक, आर्किटेक्ट फ्रँक लॉइड राइट, रॉबर्ट फ्रॉस्ट, वगैरेंनी शांताबाईंना भुरळ घातलेली दिसते.

बाकी मराठी कवीलेखक तर घरचेच. फुले, खांडेकर, फडके, शिरवाडकर, र.वा. दिघे, लोकहितवादी,आगरकर, माडखोलकर, शशीकान्त पुनर्वसू, माडगूळकर, नानासाहेब गोरे, बालकवी, नाथमाधव, ग.ल.ठोकळ, आचार्य कालेलकर, सावरकर, शरच्चंद्र, मुक्तिबोध, श्री. दा. पानवलकर, द.भि. कुलकर्णी. खानोलकर, पु.शि.रेगे. गो.ब. देवल, अच्युत बळवंत कोल्हटकर, श्री.म.माटे, दुर्गा भागवत, मारुती चितमपल्ली. इ, पासून डॉ. अभय बंग यांच्यापर्यंत लेखककवींची संस्मरणीय वाक्ये या सुवर्णमुद्रांमध्ये झगमगतात.

प्रत्येक सुविचाराला शीर्षक दिले आहे. तसे विषयवार वर्गीकरण व संकलन केलेले नाही त्यामुळे कुठेही कुठलाही विचार कुठल्याही क्रमाने आलेला आहे. या मुक्त उधळणीचा एक फायदा असा की कुठलेही पान उघडावे व वाचू लागावे. मागचा पुढचा संदर्भ बघायची गरज नाही. प्रत्येक वचन हे स्वयंपूर्ण व स्वयंसिद्ध असल्याने त्याचा मुक्त मनाने आस्वाद घ्यावा.

काही मासले बघा.

**पवित्र** - विद्वान माणसाने लेखनासाठी वापरलेली शाई ही हुतात्म्याने सांडलेल्या रक्ताहूनही अधिक पवित्र असते- महंमद पैगंबर

**प्रतिभा व बुद्धिमत्ता** - अव्वल दर्जाची प्रतिभा बऱ्याच वेळा उपाशी मरते. बऱ्यापैकी बुद्धिमत्ता जरीची वस्त्रे घालून डौलाने मिरवते- सॉमरसेट मॉम.

**संधी** - दुबळी माणसे संधीची वाट बघत बसतात. सामर्थ्यसंपन्न माणसे स्वत:साठी संधी निर्माण करतात.

**शेजाऱ्याचे अंगण** - शेजाऱ्याच्या अंगणात साठलेल्या कचऱ्यावर टीका करण्याआधी आपल्या घरासमोरचे अंगण झाडून स्वच्छ करा.

**लढाई** - दर दिवसाला जीवनमार्गी नवी पायरी चढतो मी, इतरांसंगे कमी परंतु अधिक

स्वत:शी लढतो मी.- कबीर

**बदल** - परिस्थिती बदलत नाही. आपण बदलतो.

**धिटाई** - एखादे मांजर देखील राजाकडे धीट नजरेने बघू शकते.

**सत्य** - सत्य ही अत्यंत महाग व दुर्मिळ गोष्ट आहे. म्हणून बोलताना तिचा वापर जपून करा. - मार्क ट्वेन

**धर्म** - माणसाने माणसावर प्रेम करणे हा जगातील सर्वात मोठा धर्म आहे - महात्मा गांधी

**वाट** - पावलामागे पाऊल टाकत राहिले की वाट आपोआप सरते.

**फरक** - प्रश्न विचारून आपले अज्ञान दूर करू बघणारा माणूस हा पाच मिनिटांपुरताच अडाणी असतो. पण जो मुळी प्रश्नच विचारत नाही तो जन्मभर अडाणी राहतो - चिनी म्हण

**श्रीमंती** - कर्तव्यदक्ष प्रेमळ पत्नी आणी निकोप प्रकृती यापेक्षा वेगळी श्रीमंती काय असते?

**सुख** - आपले विचार, बोलणे व प्रत्यच कृती यांच्यात एकमेळ, सुसंवाद असणे हे खरे सुख आहे.

**घातक** - भलत्या वेळी सांगितलेले सत्य असत्याइतकेच घातक असते.

**उशीर** - खरे सौख्य म्हणजे काय ते त्याला लग्न होईपर्यंत कळले नव्हते आणि तोवर फार उशीर झाला होता.

**स्वर्ग** - सुखी कुटुंब म्हणजे आपल्याला इहलोकी लाभलेला स्वर्ग आहे.

**जुगार** - लग्न हा एक जुगार आहे या. जुगारात पुरुष आपले स्वातंत्र्य पणाला लावतात तर स्त्रिया आपले सौख्य - फ्रेंच म्हण

**वादळे** - जितकी जास्त वादळे अंगावरून जातात तितकी ओकवृक्षाची पाळेमुळे जमिनीत अधिक खोलवर शिरतात.

**कलावंताची प्रार्थना** - परमेश्वरा, मला एकच वरदान दे. मला जे साधले आहे त्यापेक्षा सतत काहीतरी अधिक साध्य करण्याची इच्छा माझ्या मनात सतत राहू दे.- मायकेल अँजेलो.

**जुनी पत्रे** - जुनी पत्रे वाचताना खूप गंमत वाटते. आनंदही होतो. या आनंदाचे एक कारण असे की त्या पत्रांना उत्तरे लिहिण्याची जबाबदारी आपल्यावर नसते.

**इशारा** - तुम्ही जेव्हा आनंदात असता तेव्हा कुणालाही कसलेही वचन देऊ नका आणि तुम्ही जेव्हा संतप्त असता तेव्हा कुणाच्याही पत्राला उत्तर देऊ नका - चिनी म्हण


**किंमत : ८० रु. सवलतीत : ६४ रु.**

**सभासदांना : ६० रु. पोस्टेज : २० रु.**


शांताबाईंच्या सघन, शब्दवेल्हाळ शैलीतून साकारलेली
मनाशी संवाद साधणारी पुस्तके

आंधळी : १००रु. आंधळ्याचे डोळे : १५०रु. चौघीजणी : ३००रु.
सांगावेसे वाटले म्हणून : ९०रु. संस्मरणे : ८०रु. रंगरेषा : ८०रु.
रेशीमरेघा : ७०रु.




# मुक्तिशोध -यात्रा

## राजेंद्र प्रभुणे

**आपली आजची शिक्षण-पद्धती, विवाहपद्धती आणि शासकीय यंत्रणा यांच्यावरचे कडवट कठोर भाष्य**

वाईचे डॉ.राजेंद्र प्रभुणे हे आजच्या युवापिढीतील मानसिकतेचे मनस्वी दर्शन घडविणारी 'मुक्तिशोध यात्रा' ही चिंतनशील कादंबरी घेऊन रसिकांपुढे येत आहेत. जॉर्ज ऑरवेलच्या '१९८४' च्या जातकुळीतील ही कृती आहे. आल्डस हक्सलेच्या दि ब्रेव्ह न्यू वर्ल्ड या कादंबरीचेही कोणाला स्मरण होईल. कथानकाची रूढ चौकट बाजूला ठेवून, आपल्या आशयातील अर्थपूर्णता अधिक गडद करू पाहणारी, पोस्टमॉडर्न शैलीतील ही कादंबरी विस्कळीत तुकड्यांतून विशिष्ट गंभीर विधान मांडू पाहते.

पहिल्याच पृष्ठावर एक अवतरण आहे आणि ते या कादंबरीचे मध्यवर्ती सूत्र प्रकट करणारे आहे.

*शेवटी बाप्पानं माणसाला विचारलं, मी तुला काय देऊ?*
*माणूस म्हणाला, मला मुक्ती दे.*
*मी तुला इतकं सगळं दिलं, बद्धी, मन, माणूसपण, त्यातच तू*
*अडकलास आता बस बोंबलत!*

मनोगतात डॉ.प्रभुणे आपल्या या कादंबरीला फँटसी म्हणजे काल्पनिका म्हणता येईल असे सूचित करतात. ''नेहमीच साध्या जगण्यात किमान स्वातंत्र्याची व स्वत:च्या आयुष्याला थोडाफार आकार द्यायची अपेक्षा करणाऱ्या, स्वत:चे स्वातंत्र्य व स्वतंत्र व्यक्तिमत्त्व जपण्यासाठी झगडणाऱ्या साध्या, सर्वसामान्य 'तो'ची ही गोष्ट आहे.'' असे ते म्हणतात. सभोवतालची परिस्थिती अगतिक-बंदिस्त बनवून गुदमरायला भाग पाडते; या परिस्थितीविरुद्ध संघर्ष करताना स्वातंत्र्य आणि मुक्ती यांचा शोध घेण्याची ही मुक्तिशोधयात्रा घडते. या कथेत काल्पनिक म्हणून वर्णन केलेल्या बहुतेक गोष्टी आपल्याला आजही जाणवतात, म्हणून रूढ अर्थाने ही विज्ञान काल्पनिका नाही किंवा भविष्यवेधी कादंबरीही नाही असा खुलासाही लेखक करतो.

## पुस्तकाची खास वैशिष्ट्ये...

**ए ब्रेव्ह न्यू वर्ल्ड, ॲनिमल फार्म, एकोणिसशे चौऱ्याऐंशी यासारख्या गाजलेल्या काल्पनिक विश्वात नेणाऱ्या उपरोध-उपहासपूर्ण कादंबऱ्यांच्या जातकुळीतील नवी मराठी कादंबरी.**

**आपली शिक्षणपद्धती, आपली विवाहपद्धती, आपली शासनयंत्रणा यांवरचे कठोर भाष्य.**

या कादंबरीत पात्रांचा उल्लेख बा, मा, तो, हा, नी अशा एकाक्षरी नावांनी केला आहे. त्यामुळे आरंभी वाचकांना गोंधळल्यासारखे वाटेल. ''त्याच्या थोरल्या भावाचे नाव 'हा' होते. म्हणून आईला त्याचे नाव लाडाने 'धा' ठेवायचे होते व वडिलांना 'ए' ठेवायचे होते. पण शेवटी तो दुसरा म्हणून सर्वांच्या दबावामुळे त्याचे नाव 'तो' ठेवावे लागले. व तेच 'तो बा मा' हे त्याचे नाव अधिकृत झाले.'' यासारखे वाक्य आले की अडखळल्यासारखे वाटणारच. 'तो'हे नाव त्याला आवडत नाही. ते नाव ठेवणारे जगही त्याला आपले वाटत नाही; पण या जगात जगायला मिळाले हेच त्याचे सुदैव किंवा दुर्दैव म्हणायला हवे, असे तो स्वत:ला पटवू पाहतो. तरीही या कादंबरीची मुख्य पात्रे म्हणजे मा व बा यांचा मुलगा 'तो', त्याची पत्नी होणारी नी, त्यांची कन्या मुक्ती, तिचा नवरा मे...

या जगात जगण्याची एकूणच विधीप्रणाली त्याला खटकत राहते. **शैशवनाश** आणि **धर्मजातिप्रवेश संस्काराच्या वेळी** त्याच्या डाव्या करंगळीचे टोक लाल रंगवून तिच्यावर धातूचे रोपण घातले जाते आणि त्याच्या उजव्या मांडीवर धर्म व जातीचा क्रमांक गोंदण्यात येतो. मात्र दोन्ही खांदे आणि दंड झाकणारे वस्त्र घालण्याची सक्ती त्याला आवडत नाही. इतर लोकही अशी वस्त्रे का घालतात याचे पटण्यासारखे कारण त्याला वडील सांगू शकले नाहीत. 'विवस्त्र राहण्याच्या स्वातंत्र्याचा संकोच' त्याला खटकतो. वर्गातली मुले त्याला रडूबाई म्हणत; शिक्षक त्याला मतिमंद मानत. त्याच्या शंकांना उत्तर देण्याचे टाळत; पण कसाबसा तो महाशिक्षण कार्यशाळेचा अभ्यासक्रम पूर्ण करतो. निकाल बघण्यासाठी निघतो तेव्हा वडील त्याला सांगतात, ''तुझ्या मनाप्रमाणे तुला आयुष्य घालवता यावे यासाठी जमेल ते सगळं मी करीन. पण तुला बेकार ठरवलं जाणार नाही याची काळजी घे.'' परीक्षेतील अपयशामुळे निराश होऊन मुलांनी आत्महत्या करू नये म्हणून त्या कार्यशाळेत खास प्रतिबंधात्मक व्यवस्था करण्यात आलेली असते. (उदा. अल्पोत्तेजक चूर्ण क्र.१ ते ४, सांत्वनरस क्र. ५, मृदू आनंदरस क्र.२, फुकट देण्यात येईल. मंदोत्तेजक फुंकनळ्या व गुंगमती चघळद्रव्य कमी दरात उपलब्ध. उंची अत्यानंद रस एक पेला फुकट... बडविण्याजोगी वाद्ये व इतर वस्तूंची मोडतोड झाली तरी चालेल.) या व्यवस्थेच्या वर्णनाद्वारे 'तो'च्या विक्षिप्त मानसिकतेची चुणूक वाचकांना दिसते; आणि त्याच्या पुढच्या वाटचालीचा मार्ग चमत्कृतिपूर्ण व अवघड असणार हे लक्षात येते.

महाशिक्षण कार्यशाळेतील त्या परीक्षेचा निकाल देण्याची पद्धतही वेगळी असते.



'संगणकातून एक ते शंभरपर्यंतचे, सातव्या रेटिंगचे, स्यूडो रँडम क्रमांक काढून त्यांचे फोर्थ डिग्री रँडम सँपलिंग करून ते क्रमांक तुमच्या गुणांकाच्या जागी लिहिले आहेत... त्या गुणपत्रिकेवर तुमचे नाव व क्रमांक लिहा. तो तुमचा निकाल.' डोळे बांधून कुठली तरी गुणपत्रिका घ्यायची ही आणखी एक अट आहे.

परीक्षेसाठी लिहिलेल्या उत्तरपत्रिका तपासण्याचे कारणच उरत नाही अशी गुणपत्रिका निवडली की झाले, पण हा आपल्यावर अन्याय आहे असे त्याला वाटते. कारण त्याला आत्महत्या करावीशी वाटते. आचार्य म्हणतात, ''स्वत:बद्दल तुमच्या फाजील कल्पना आहेत. तुम्ही अजून लहान आहात. भलत्याच अपेक्षा ठेवून जगाल तर व्यवहारी जगात तुमचा निभाव लागणार नाही.'' गुणांकाबद्दल वाद घालून काही उपयोग होणार नाही असेही वर महागुरू बजावतात. उपमहागुरू सांगतात,''जा मुलांनो, आम्ही तुम्हाला उघड्या जगात फेकत आहोत... कर्तृत्व गाजवा... आता आठवडाभर नवीन चाचण्या होतील. त्या देण्याची सक्ती नाही. पण त्या न दिल्या तर तुम्हाला कोणतेही भवितव्य नाही.'' बुद्धिमत्ता, आवड व कल यांच्या चाचण्या म्हणजे त्याला छळसत्र वाटते. शेवटच्या चाचणीत धर्म व जात याबद्दल माहिती विचारली जाते.

उपमहागुरू नंतर स्पष्ट करतात, ''या चाचण्या वैयक्तिक गुणवत्ता जाणून घेण्यासाठी नाहीत. शैक्षणिक क्षेत्रात सामाजिक गुणवत्ता,समान संधी आणि सामाजिक न्याय या संकल्पनांना सध्या महत्व आहे.'' ...तरीही त्याला आत्मोन्नती मंत्रालयाचे मुलाखतीसाठी पत्र येते. ते पत्र घेऊन गेल्यावर त्याला आपल्याला काही हवं असेल तर त्यासाठी काही देण्याची तयारी हवी असा धडा देण्यात येतो. आणि एकाच पत्रातल्या निरनिराळ्या गोष्टींच्या माहितीसाठी थैलीभर पैसे देण्याची मानसिकदृष्ट्या त्याची सिद्धता होऊ लागते... शिक्षणकार्यकर्ता होण्यासाठी त्याची निवड होते. तो म्हणतो,''मला तंत्रज्ञ-शास्त्रज्ञ व्हावंसं वाटतं. शिक्षणकार्यकर्ता नाही.'' त्याच्या मुलाखतीचा फार्स मग होतो. ''तुम्ही मुलं सहनशील आहात. इतकी सहनशीलता चांगली नाही. पण ती आणखी वाढत जावी. ही मुलाखत केवळ रीत म्हणून आहे. तुमची निवड निश्चित आहे....'' (३८) असे त्याला सांगण्यात येते.

...शिक्षणकार्यकर्ता निर्मिती महाशिक्षण शाळेतील अनुभवांचेही असेच उपरोधपूर्ण तपशील पुढे येतात. (३९-७२) उदाहरणार्थ, शिक्षणकार्यशाळेत 'शिका'च्या कर्तव्यातील पहिले कर्तव्य म्हणजे संचालक सं यांच्या कानात, नाकात, व बेंबीत रोज एक एक थेंब तूप सोडणे, मधल्या सुटीत पाच मिनिटे मुख्य शिक्षकांचे पाय चेपणे हे दुसरे कर्तव्य, शिम हं यांना रोज तीन वेळा मुजरा करणे हे तिसरे कर्तव्य, मुलांना शिकवणे हे पाचवे कर्तव्य. पण ते व्यवहारात कर्तव्यच नव्हते. कारण संगणकावर सर्व ज्ञान सुलभपणे मिळत असल्याने शिकवायचे कोणाला हा प्रश्नच असे. तशात संगणक यंत्रमानव व अर्धयंत्रमानव सर्व कामे करीत मग शिकायचे कशाला असा प्रश्न होताच. (७१)

बेकारांच्या वस्तीला भेट दिल्यावर त्याला अनेक अर्धपोटी व जीर्ण वस्त्रे घातलेले तरुण दिसतात. ''आम्ही तडजोड करणं नाकारलं. निर्मिती व स्वातंत्र्य या कल्पना आमच्या मेंदूवर तापल्या सळईने डाग दिल्याप्रमाणे कोरल्या गेल्या आहेत. त्यामुळे आमचा मेंदू कायमचा बेकार झाला आहे... ही अवस्था स्वेच्छेने ओढवून घेतली आहे. स्वातंत्र्य अबाधित ठेवून सन्मानाने एक घास मिळावा ही आमची इच्छा आहे, पण ती कधी पूर्ण होणे नाही.'' (७८)

कामासाठी तो नंतर ज्या केंद्रात जातो ते असते बेकार मुक्तिदाता केंद्र. प्रचंड अभ्यास, प्रात्यक्षिके, सराव, अनुभव, पूनर्मूल्यांकन, नवीन गोष्टींशी परिचय अशा प्रक्रियेतून तज्ज्ञांची

निर्मिती करण्याचे काम तेथे चालते. त्यातही डावा बेकार मुक्तिदाता व उजवा बेकार मुक्तिदाता असे पदव्यांचे प्रकार असतात. खोटी कागदपत्रे तयार करणाऱ्याला उजवा कनिष्ठ बेकार-सहा हा दर्जा मिळतो. हजार हत्या करणाऱ्याला डावा बेकार मुक्तिदाता- पाच हा किताब मिळतो. तो मनुष्यवधाला पात्र ठरतो. ज्या बेकायदेशीर गोष्टींचा परिणाम म्हणून जीव जाऊ शकतो त्या गोष्टी करणारे डावे, बाकीचे उजवे. विषारी पदार्थांची भेसळ करणारे डावे. निरुपद्रवी भेसळ करणारे उजवे. नेते, समाजरक्षणकर्ते हे डावे... या मुक्तिदात्यांच्या दर्शनाने 'तो' प्रभावित होतो... आणि शिशु-बाल-कुमार उत्क्रांती केंद्रात राहून सर्वेक्षणाचे आपले वेड पूर्ण करतो. जगातील शिल्लक राहिलेल्या वनस्पतींचे सर्वेक्षण करून तो गेल्या दहा वर्षात एकही वनस्पती या भागात आढळली नाही अशा निष्कर्षाप्रत येतो. (९०)

'तो'च्या जीवनातला पुढचा टप्पा येतो तो विवाहाचा. कोणातरी कुमारी'नी'शी त्याचे गुफ्तगू चालू होते. तेव्हा एक माणूस त्याला भेटून सांगतो.''लग्नाआधी आमची परवानगी रीतसर घ्यावी लागेल. दोघांच्या तपासण्या व अनुरूपता चाचण्या घेऊन परवानगी देऊ... लग्न ही सामाजिक गोष्ट आहे. शारीरिक संबंध ही खाजगी गोष्ट होऊ शकते पण लग्न ही गोष्ट खाजगी नाही.''(९४)

लग्नचिकित्सा, मार्गदर्शन व परवानगी केंद्रात त्याच्या वेगवेगळ्या तपासण्या होतात. (शारीरिक, रासायनिक, इलेक्ट्रॉनिक, आंतरदर्शक, मानसशास्त्रीय, व्यक्तिमत्त्व निदर्शक, समाजशास्त्रीय इ.इ.) या तपासण्यांतून त्या दोघांच्या लग्नाबाबत काही अडचणी उपस्थित होतात. (उदा. तुम्हा दोघांचा धर्म व जात समान. वंश-धर्म-जाती संकराच्या दृष्टीने ते गैर ठरते. कुंडलीतील आकडे वीस टक्के फरक दाखवतात, तुमचे मानसिक सामर्थ्य तरंग तुल्यबळ व एकदिश आहेत.इ.)मात्र विशिष्ट शुल्क देऊन या अडचणी झुगारून देण्याचा पर्यायही खुला असतो. (१०८) परंतु त्यांना फक्त पूर्वलग्नाची परवानगी मिळते. संपूर्ण लग्नाची नाही. हे पूर्वलग्न समाजमान्य होणार नाही अशी भीती 'नी'च्या वडिलांना वाटते... तरीही पूर्ण लग्नाला सरकारची परवानगी मिळत नाही. तसे केले तर ते बेकायदेशीर ठरेल असे सांगण्यात येते... तेव्हा नी निर्धाराने म्हणते, ''मी 'तो' बरोबर पूर्वलग्न करून राहायला तयार आहे...''

विवाह नोंदक त्यांना शपथ घ्यायला लावतो.

''मी श्रीमान तो विवाहाच्या स्थैर्यासाठी चारही पायांवर उभे राहून, नसलेल्या शेपटीच्या साक्षीने-कंबर वर उचला- शपथ घेतो की मी कु. 'नी' हिला माझी विश्वमान्य पत्नी म्हणून ताब्यात घेत आहे. मी किंवा ती मरेपर्यंत किंवा दोघांपैकी कोणी हरकत घेईपर्यंत मी तिला पत्नी म्हणून वागवेन. आजपासून ती माझी कायदेशीररीत्या वैयक्तिक, संपूर्ण मालकीची, वहिवाटीची व उपभोगाची वस्तू असून तिचे शरीर, मन व प्राण यांवर माझी आणि फक्त माझी संपूर्ण, विनाअट सत्ता चालेल. परंतु याला काही अटी आहेत- अट एक, वरील सर्व मालकी हक्कांचा उपयोग मी स्वतंत्र प्रदेशाच्या महासत्तेच्या पूर्वपरवानगीशिवाय करणार नाही. अट दोन, तिला मारण्यासाठी मी फक्त पुढचे पाय, कंसात हात वापरीन आणि अट तीन, विशेष अट हे फक्त पूर्वलग्न असल्याने उत्तर लग्नाशिवाय म्हणजेच पूर्णपरवानगीशिवाय आम्ही मूल होऊ देणार नाही.'' (१३५)

विवाह नोंदक त्या दोघांना नंतर सांगतो, ''माझी भूक अनावर आहे. उत्तर विवाहाच्या परवानगीसाठी याल तेव्हा हे विसरू नका म्हणजे झालं.'' (१३७)

नंतर प्रत्यक्ष विवाह विधी. नवऱ्याला सजवून एका खोलीत बंदिस्त ठेवणे ( नवरदेव पळून



गेल्याने वधूपक्षाची बेअब्रू होऊ नये म्हणून), कुलपुरुषाचे दर्शन, दोन्ही हात दोरखंडांनी बांधून थोरले काका व मामा यांनी मंडपाकडे वराला नेणे, पायात किलोकिलोच्या लग्नबेड्या अडकविणे (पाय जमिनीवर राहावे म्हणून खास दक्षता), डाव्या हाताला व उजव्या पायाला प्लॅस्टर करणे; (लग्न संबंधातील अवघडलेपणा समजावा यासाठी केलेली योजना), 'नी'च्या गळ्यात लोढणे म्हणजे प्लॅस्टिकचा भरीव सोटा सोन्याच्या साखळीने अडकविणे, दोघांना कपाळाला कपाळ, छातीला छाती लावून उभे करून भोवती लाल हिरव्या दोऱ्यांचे पंधरा वेढे देणे (पूर्वीचे सात जन्म, पुढचे सात जन्म आणि चालू जन्म यातील एकत्र आयुष्यासाठी) बंधसाखळी विधी, सहस्त्र मंत्र शतपावली विधी इ.

लग्नानंतरच्या तीन वर्षात सासूसुनेची पाच, वडिलांची तीन अशी किमान आवश्यक रीतसर भांडणे व नवीन घरात स्थलांतर. पगारातून नव्या घराचे हफ्ते भरण्याची सोय... पाच वर्षांनी त्यांना लग्न व नवनिर्माण केंद्राकडून बोलावणे येते. ''तातडीने एका मुलीला जन्म देण्याची तयारी करा. पुनरुत्पादनक्षम नरमादी म्हणून तुमचे कर्तव्य पार पाडा. तुमच्या उत्तर विवाहाला परवानगी देण्यात येत आहे.'' (१५७)

मुक्तविहारात मग त्यांची रवानगी होते. यथावकाश मुलगी होते. तिचे नाव मुक्ती ठेवण्यात येते. ( इतके लांब, अवघड व निरर्थक नाव ठेवल्याचे आतापर्यंत कोणी ऐकले नव्हते.)

आणखी काही दिवसांनी 'तो'ला पुन्हा तपासण्यांना सामोरे जावे लागते. त्यानंतर त्याला सांगण्यात येते , ''मनाच्या वैचारिक अवकाशाच्या संकोची दक्षिण गोलार्धातील, भावना दडपणाऱ्या मार्गावरील कुढणाऱ्या आतल्या गाठीचा मुक्त-चिंतक, व्यक्तिकेंद्रित, बेछूट मानसिक कर्करोग तुम्हाला झालेला आहे; तो तिसऱ्या अवस्थेतला आहे... तुम्हीच त्यावर हवे ते उपचार करू शकता. कारण शेवटी शरीर, बुद्धी आणि मन तुमचं आहे. त्यांचे रोगही तुमचेच आहेत.''(१९९)

कन्या मुक्ती व जावई मे हे त्यांचा पासष्ठावा वाढदिवस थाटात साजरा करतात. दरम्यान 'नी'चा मृत्यू होतो... तो आजारी पडतो तेव्हा त्याला तात्काळ शरीर दुरुस्ती केंद्रात दाखल व्हावे लागते. तपासण्या होतात. उपचार होतात. तरीही शतायुषी होईपर्यंत जगणे भाग असते. मुक्तिदाता केंद्रात जाऊन मात्र मृत्यू पत्करता येतो. त्या केंद्रात आलेल्या मरणोत्सुक व्यक्तींशी तो बोलतो. मृत्यू अचानक आला तर ठीक; पण आपण होऊन त्याचा स्वीकार करायचा नाही. मुक्तीचा शोध अजून संपलेला नाही.

आपली शिक्षणपद्धती, आपली विवाहपद्धती व तिचे सामाजिकीकरण, माणसाच्या आयुष्याचे सर्वंकष नियंत्रण करणारी शासनयंत्रणा, औषध उपचार पद्धती, मृत्यूकडे पाहण्याची दृष्टी या सर्वांची एक कल्पनात्मक चौकट उभी करून, त्या चौकटीत कोणाही व्यक्तीच्या स्वातंत्र्याची व सर्जनात्मक उर्मीची होणारी घुसमट दाखवण्याचा प्रयत्न डॉ.राजेंद्र प्रभुणे यांनी केला आहे. त्यासाठी त्यांनी उभी केलेली काल्पनिक देशातील कार्यप्रणाली व विविध शासकीय यंत्रणांची व अधिकाऱ्यांची नावे (शिक्षणकार्यकर्ता,शरीर दुरुस्तीकार्यकर्ता, विवाहनोंदक, लग्नचिकित्सा केंद्र) चातुर्यपूर्ण आहेत. सद्य:जीवनावरचे एक उपरोधात्मक भाष्य म्हणून या प्रयत्नाची दखल घ्यायला हवी. 'ब्लॅक ह्यूमर'चा हा नमुना अनेकांना मार्मिक व मर्मभेदक वाटेल. जॉर्ज ऑरवेल, जोनाथन स्विफ्ट यांचे स्मरण होईल.

**किंमत : १७० रु. सवलतीत : १३६ रु.**

**सभासदांना : १२० रु. पोस्टेज : २० रु.**




# शेवटची लढाई

डॉ. आनंद यादव

## उपरोध-उपहासाद्वारे सद्यःस्थितीतील विसंगतीवर शरसंधान

गोपाळ भटजी आणि निवडणुकेश्वर, पीळ, महाराजांचा वाढदिवस, वाघिणीची गाढवं, रजिस्ट्रार साहेबांची पत्नी, शिवरामाचे आरसे आणि शेवटची लढाई अशा नऊ कथांचा समावेश असलेला आनंद यादव यांचा तिसरा विनोदी कथासंग्रह नुकताच प्रसिद्ध झाला आहे. या कथांद्वारे आनंद यादव यांनी गेल्या दोनतीन दशकांत महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय क्षेत्रात दिसलेल्या विसंगतींवर उपहास-उपरोधाच्या माध्यमातून शरसंधान केलेले आहे. आजच्या भ्रष्ट जीवनावर भाष्य केले आहे. सामान्य माणसाची या चमत्कारिक निगरगट्ट वातावरणात होणारी कोंडी व्यक्त करण्यासाठी विनोदाचा आश्रय घेण्यावाचून गत्यंतरच नाही अशी धारणा होते. वास्तव इतके तर्क-विसंगत आहे की माणसाची मतीच गुंग व्हावी.

आपल्या विनोदाचे शस्त्र चालवण्यासाठी आनंद यादव यांनी निवडलेली क्षेत्रे कोणकोणती आहेत? संधिसाधू राजकीय नेते, बुभुक्षित आणि भ्रष्टाचारी शासकीय नोकरवर्ग, उथळ सौंदर्य व प्रतिष्ठेच्या भ्रामक कल्पना यांनी झपाटलेल्या नवश्रीमंत बायका, आपल्या अवतीभवतीच्या दुःखदारिद्र्याचा विसर पडावा म्हणून अन्य काहीच मार्ग दिसत नसल्याने व्यसनांचा आश्रय घेणारा सामान्य माणूस यांच्यावर यादवांचा विशेष कटाक्ष आहे.

भारतीय माणसाच्या मनात देवाधर्मावरची, नवससायासावरची श्रद्धा ही खूप खोलवर रुजलेली आहे आणि तिचा फायदा घेणारा भटभिक्षुकांचा वर्गही पूर्वपरंपरेने चालत आलेला आहे.

एखादा कल्पक गोपाळ भटजी आपल्या समयसूकतेने या व्यवहाराला कसे नवे वळण देऊ शकतो याची कहाणी ''कोणे एके काळी पुण्यनगरीत गोपाळ भटजी नामक एक दरिद्री ब्राह्मण राहात होता...'' अशी सुरू होऊन ''कलियुगातील धर्मनाट्य गोपाळभटजींच्या दृष्टीस पडले आणि त्यांना दुसरा साक्षात्कार झाला. अष्ट सात्त्विक भावांनी त्यांच्या अंगावर दरदरून घाम आला.'' अशा संस्कृतप्रचुर शैलीची भारदस्त वळणे घेत, 'निवडणुकीत सगळ्यांचे वत्सांचे व नंदीबैलांचे तेच आता ईश्वर होऊन एखाद्या हुकूमशहा दिल्लीश्वरासारखे गोप्रासादात जाऊन विसावले'अशा उपरोधपूर्ण



### पुस्तकाची खास वैशिष्ट्ये...

- 'झोंबी'कार आनंद यादव यांच्या विनोदी शैलीतील कथांचा तिसरा संग्रह.
- कहाणीसदृश कल्पनारम्य उपरोधपूर्ण कथावस्तूंद्वारे निवडणुका, धर्मभोळेपणा, प्रतिशिवाजींची स्टंटबाजी, न्यायालयातील दिरंगाई, नवश्रीमंतांचा ढोंगीपणा -यावर केलेले मार्मिक शरसंधान
- मूल्यहीन, चारित्र्यहीन अशा सद्यःकालीन जीवनाबद्दलची चीड प्रभावीपणे प्रकट करण्याची हातोटी.

शरसंधानाने शेवटच्या 'वाचकहो'संबोधनापर्यंत जाऊन सफळ संपूर्ण होते.

''वाचकहो, तुम्ही लोकयुगात निवडणुकेश्वराला नवस बोला आणि फक्त एकदाच निवडून येऊन आजन्म धन मोजीत बसा. भगवान गोपाळ भटजींचा आणि निवडणुकेश्वराचा तुम्हाला भरपूर आशीर्वाद असो. देवाची भक्ती करता करता एक दिवस तुम्हालाही दिव्य साक्षात्कार होईल की, लोकशाहीतील अनागोंदी परिस्थितीवर जॉकीसारखा स्वार होऊ पाहणारा पण गरिबीचं पांघरुण घेऊन संधीची वाट पाहत दबा धरून बसलेला तुमच्याही मनात एक गोपाळ भटजी आहे.'' असे भाष्य करताना यादवांच्या मनात निवडणुकीतील गैरप्रकारांबद्दलचा असंतोष व संताप कसा कडवटपणे खदखदत आहे याची थोडीशी कल्पना येते. समकालीन संदर्भही या सर्व लेखनात पानोपानी येतात.

''परवा पुण्यनगरीत अशाच एका आयुक्ताच्या बदलीवरून दीर्घ काळ संप झाला. अनेक दिवस नगरी बंद ठेवली. सभा घेतल्या. मोर्चे काढले, निषेध केले. महासभा झाली... तिला हजर राहून आलेले भगवान गोपाळ भटजी म्हणाले, ''ही जनता कितीही संप, मोर्चे, निषेधसभा घेऊ दे. तिला यश मिळणे त्रिकाल शक्य नाही... कोणतीही कृती मला विचारून मुहुर्ताने केल्याशिवाय आणि निवडणुकेश्वराला नवस बोलल्याशिवाय तिला यश मिळणार कसे?''

परंपरागत ब्रह्मकर्माला म्हणजे भिक्षुकीला उतरती कळा लागलेल्या गोपाळ भटजींना शनिपारावर एके दिवशी स्कूटरवरून शनीला नमस्कार करून जाणाऱ्या विलायती वेषातल्या विज्ञाननिष्ठ तरुणाचे दर्शन घडते आणि ते साक्षात्कारासारखे भासते. कारण कलियुगातही धर्म वेशान्तर करून वावरतो आहे आणि त्याला शोधून आपण त्याच्यावर स्वार व्हायला हवे असे त्यांच्या लक्षात येते. लगेच उद्योगपतींकडच्या पूजांचे कॉन्ट्रॅक्ट गोपाळ भटजी घेतात. पूजेचे सबकॉन्ट्रॅक्ट देऊन इतर भटांकडून दक्षिणेतील वीस टक्के त्यांचे. घरबसल्या आयते. एक ट्रस्ट स्थापन करून बेवारस गायींसाठी गोशाला काढतात. पुण्यनगरीतील सवत्स धेनूंना पती-पत्न-कन्या सहपरिवार गोशाळेत आश्रय देऊन सेवा करतात. शुद्ध तूप, दूध, गोमूत्र योग्य किंमतीत विकण्याची व्यवस्था करतात. त्या गोशाळेच्या आवारात ऐन निवडणुकीच्या धामधुमीत विहीर खोदण्याचे काम चालू असताना गोपाळभटजींना एक मूर्ती 'सापडते'. त्या 'स्वयंभू' मूर्तीसाठी देऊळ बांधायलाच हवे. धनिकांची

व देणग्यांची रास लागते; आणि आपण निवडणूकेश्वर म्हणून अवतार घेऊन आपल्या भक्तांना निवडणुकात यश मिळवून देणार असा दृष्टान्त झाल्याचे जाहीर केल्यावर तर मंदिर किती अवाढव्य होणार हे सांगायला नकोच.

डॉ.आनंद यादव सद्य:काळावर बरेच चिडलेले दिसतात. आजकालच्या लोकांतील ढोंगीपणाने ते क्रुद्ध झालेले दिसतात. त्यामुळे त्यांच्या वक्रोक्तीला बहर येतो.''महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर मराठी मायभूत प्रति-शिवाजींचं एक पेवचं फुटलं. अचानक एक नवी परंपरा सुरू झाली. त्या परंपरेत दर दोनतीन वर्षात एक प्रतिशिवाजी जन्माला येत होता. त्या परंपरेतील हे सोळावे प्रतिशिवाजी होते. त्यांचा सत्तरावा वाढदिवस... पण त्यांची महत्त्वाकांक्षा असते प्रत्यक्ष पर्वतीवर प्रति-रायगड उभारण्याची. दुर्दैवाने ती फलद्रुप न झाल्याने टेकडीच्या पायथ्याशी रायगड प्लाझा बांधूनच त्यांना संतुष्ट राहावे लागते. तरीही पुण्यातल्या इतर इमारतींपेक्षा 'बोटभर उंच' ठेवून आठही मजल्यांना जावळी तट, टकमकतट अशी नावे देऊन तसेच आठव्या मजल्याचे बालेकिल्ला व गच्चीचे राजसभा असे नामकरण करून ते आपले प्रतिशिवाजीपण अबाधित राखतात.''

अशा या सोळाव्या प्रतिशिवाजीचा सत्तरावा वाढदिवस, ऐतिहासिक लुटुपुटी इस्टाइलमध्ये कसा साजरा होतो- याच्या गमतीजमती 'महाराजांचा वाढदिवस'मध्ये आनंद यादव रंगवून सांगतात. पुण्यात पत्रकारांचा व मित्रांचा खासा दरबार; शिवाय शुभ्रवस्त्रांकित छबिना, गरीबांवर धाड घालणारा हा वाढदिवस वाई-जावळीच्या दुष्काळग्रस्त पब्लिकला 'धाडदिवस' वाटतो असेही कथालेखकाला सांगावेसे वाटते.

वाघिणीची धार काढणाऱ्या शिवा गवळ्याच्या गौरवाचा समारंभ होतो, आणि मंत्री त्याच्या झोपडीला भेट देऊन त्याचा ऐतिहासिक गोठा बघतात. ''तेथील तीर्थ प्राशन करून शिवाच्या मुलीचा भागीचा प्रेमानं एकएक गालगुच्चा घेतात. वाघिणीचं घोटघोटभर दूध घेऊन देशाच्या कल्याणाचा उद्घोष करून मुंबईला राज्य करायला निघून जातात.''

या कथेच्या शेवटी पुन्हा उपरोधाचा आविष्कार होतोच. ''उघडी नागडी पोरं त्या मंत्र्यांच्या रंगीत राजेशाही गाड्या बघून हरखली. तसंच तुम्ही आम्ही उपाशी राहून, राज्य करणाऱ्यांकडं पोटभर बघत बसू या आणि हरखून जाऊ या.''

'बेलदाराची गाढवं'या कथेची ही सुरुवात बघा.

''कोणे एके काळी भारत नावाच्या देशात अनेक राज्ये होती. ही राज्ये गुण्यागोविंदानं एकत्र नांदण्यासाठी लोकशाही नावाची एक नवी राज्यपद्धती आणि नवी जीवनमूल्य आपली गेली. अनेक प्रकारची विषमता असलेल्या त्या विचित्र देशात समता नावाचं एक मुल्य लोकांना फार प्रिय झाले. त्या मूल्यासाठी नवे कायदे आले... नवे न्यायाधीश आले तसे नवे वशिले आले. नवे वकील आले तशी नवी भांडणे आली. नवे कायदे आले तशा नव्या पळवाटा आल्या. नवी पिढी आली तशी नवी डोकी आली... त्या नव्या डोक्यात नव्या विचारांची जाती फिरू लागली. त्या जात्यातून नव्या मूल्यांचं पीठ पडू लागलं. त्या पिठाची टेस्टदार भजी करता येऊ लागली. समतेची भजी ही सगळ्यात खमंग भजी म्हणून प्रसिद्ध झाली. रोज सकाळी ती ताजी ताजी वृत्तपत्राच्या पुडक्यात बांधून मिळू लागली.''

नवीन भांडणे, नवे वशिले, नव्या तरुण रक्तांचे नवे चाळे याद्वारे लोकशाहीला खतपाणी घालू लागले.

-अशा या नव्या लोकशाहीतल्या द्विभार्याप्रतिबंधक कायद्याला धाब्यावर बसवून वसंतराव एकदम दोन पोरींशी लग्न करायचा घाट घालतो. कोर्टात केस उभी राहते. वसंतराव सुटतो. त्याचा युक्तिवाद काय असतो? ''मी दोन लग्नं केलीच नाहीत. एकच लग्न केले. दोन बायका



एकदम केल्या तर तो गुन्हा आहे असे कायद्यात कुठेच नाही... आणि न्यायाधीश तो युक्तिवाद ग्राह्य धरून त्याला संशयाचा फायदा देऊन सोडतात. (कथालेखक त्याला पुढे पुस्ती जोडतो- शिवाय खंडोजी पाटलांची आणि मॅजिस्ट्रेटसाहेबांची जुनी ओळख होती. त्यामुळंही न्याय निवडा नीटपणे झाला.) परंतु फौजदाराची समजूत पटत नाही. अपील होते. चार बायका व १९ मुले असणारे न्यायमूर्ती शेख वसंतरावांना दीड वर्षांची शिक्षा देतात. आणि वेड्या लक्षूला कोर्टात आपली गाढवं दिसू लागतात. लेखक वाचकांना सांगतो, ''वाचकहो, लक्षूला जशी गाढवं सापडली तशी भारत नावाच्या देशातील तुम्हांला तुमची गाढवं वेळेवर सापडोत.''

वसंतरावांचा युक्तिवाद, चार बायका असलेल्या न्यायमूर्तींनी त्यांना दिलेली शिक्षा, बेलदार लक्षूची त्याच्या चुलत्याने हिसकावून घेतलेली गाढवं- या सगळ्यांची मोट वळून सध्याच्या न्यायालयीन कामकाजाची निरर्थकता कथालेखक दाखवू पाहतो. शवटचा लक्षूच्या गाढवांचा प्रसंग त्यात काहीसा उपरा ठरतो. पण कायदा गाढव आहे, न्यायालयात जाणारे सगळे गाढव आहेत हा संदेश पोचवण्यासाठी कथालेखकाला दुसरा पर्याय सापडला नसावा.

उच्चवर्णीयांच्या बेगड्या जीवनशैलीवरही कथालेखकाचा रोख आहे. रजिस्ट्रारसाहेबांची पत्नी स्वत:चं वेगळं विश्व तयार करून जगू पाहते. मृत्यूनंतर चंद्रगुप्ताला त्या सांगतात, ''माझं सौंदर्य घेऊन मी आलेच आहे. मला लक्सची वडी, पावडरीचा डबा आवडेल... मी स्वैंपाक केला. स्वच्छता ठेवली. रेडिओ ऐकला. टीव्ही बघितला. भूतकथा-हेरकथा वाचल्या. माझं सौंदर्य काळजीपूर्वक सांभाळलं... आमचे साहेब रजिस्ट्रार होते. त्यांना शोभेशी वागले. पुढचा जन्म पृथ्वीवरच हवा. मज्जा येते. पण स्वतंत्र ब्लॉक किंवा बंगला द्या.-- आसपास कोणी भाडेकरू नकोत. खालच्या दर्जाची माणसं नकोत. मी एवढी मेले पण एकसुद्धा शेजारी रडला नाही. त्यांचं उट्टं काढण्यासाठी तरी पुढचा जन्म हवाच.''

आणि या कथेचा शेवट?

''विजेचं निरांतन लावून देवाची त्यांनी पूजा कायम केली होती. तो देव त्यांच्या आत्म्याला शांती, सौंदर्य आणि लिपस्टिक देवो. आणि हो! त्यांना एक फुकटचा सरकारी शिपाईही देवो.''


लोकशाहीतील निवडणुकींची नवलाई व त्या जिंकण्यासाठी करावी लागणारी चलाखी- यांची साग्रसंगीत हकीकत 'शेवटची लढाई' या 'प्रकरणात' आली आहे. बृहन्नडा उत्सवाच्या उज्ज्वल परंपरेला पुनरुज्जीवित करणे, लोकांच्या बारशापासून बाराव्यापर्यंतच्या निरनिराळ्या कार्यक्रमांना जाऊन लोकसंपर्क साधणे...निवडणुकीतील यशासाठी उमेदवार व त्यांचे पाठीराखे चोळीलुगडी नेसून, हातात बांगड्या व कपाळावर मळवट भरून सुरगंगेच्या काठावर एकत्र येऊन ढोलताशाच्या नादात फटाक्यांच्या आवाजात ठो ठो ठो बोंबा ठोकून शिव्यांच्या स्वर्गीय पुष्पवर्षाव करतात...''

डॉ. आनंद यादव यांच्या राजकीय सामाजिक उपरोधांची धार अनेकदा कडवटपणाकडे झुकते. त्यांच्या मनातली चीड उसळून येते... कथानकाच्या विसविशीत चौकटी धुडकावून लावून ती दुथडी भरून झेपावते.

अशा या उपरोधाने, उपहासाने हास्यापेक्षा चीडच अधिक खदखदून वर येते. मूल्यहीन व चारित्र्यहीन सवंग राजकारणाबद्दलची घृणा त्या चिडीतून प्रकट होते. फँटसीच्या अंगाने खरे तर तिला अधिक न्याय मिळू शकला असता. आताच्या या रूपात या सगळ्या विसंगतीपुढे आपण हतबल आहोत असाच पराभूतपणाचा भाव प्रभावशाली होतो.

**किंमत : ९० रु. सवलतीत : ७२ रु.**

**सभासदांना : ६८ रु. पोस्टेज : २० रु.**




# चाळिशीनंतरची वाटचाल

**डॉ. सुभाष दांडेकर**

## परिपूर्ण सुखी उत्तरायुष्यासाठी आवश्यक असणारी पूर्वतयारी

सातारचे एक नामवंत डॉ.सुभाष दांडेकर यांचे 'चाळिशीनंतरची वाटचाल'हे पुस्तक चाळिशीचा टप्पा ओलांडणाऱ्या प्रत्येकाला उपयुक्त वाटेल. 'लाइफ बिगिन्स ॲट फॉर्टी' असे सध्या मानतात. कारण चाळिशीचा हा टप्पा हा आता पूर्वीसारखा वार्धक्याचा आरंभबिंदू राहिलेला नाही. तो साठीकडे झुकत आहे. तरीही चाळीशीनंतरचे आयुष्य हे अनेक दृष्टीनी वेगळे ठरतेच.

डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत चाळिशी हे आयुष्यातील एक संदर्भकेंद्र असून शारीरिक, मानसिक व कौटुंबिक बदलांची जाणीव ठेवून उर्वरित आयुष्याचे नियोजन करण्याची गरज प्रकट केली आहे. डॉ. दांडेकर यांनी वृद्धाश्रम व नेत्रपेढी या क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल व त्यांच्या सामाजिक बांधिलकीबद्दल डॉ. सरदेसाई त्यांना समाजाचे भूषण म्हणतात आणि या पुस्तकात शारीरिक व्याधींप्रमाणेच सामाजिक व कौटुंबिक समस्यांबाबत केलेले मार्गदर्शन महत्त्वाचे आहे याकडे लक्ष वेधतात.

चाळिशीआधीचा काळ हा उमेदवारीचा असतो. त्यानंतर नोकरीधंद्यात स्थिरता येते. प्रमोशन्स मिळणे व व्यावसायिक प्रगती होणे हे पुढच्या काळातच सुलभ जाते. आजवरचा अनुभव यासाठी उपयुक्त ठरतो. चाळिशी ते साठी हा आयुष्यातील काळ वर्तमानावर पकड ठेवून भविष्यकाळ आश्वासक ठरवण्याचा असतो. आपले उत्तरायुष्य आनंदमय करण्यासाठी आवश्यक ती बैठक चाळिशीतच साधावी लागते.

या पुस्तकातील आरंभीची सात प्रकरणे मेनोपॉज, स्त्रियांचे रोग, मोतीबिंदू, हृदयविकार, मूत्रसंस्थेचे विकार, मधुमेह यांची चर्चा करतात. चाळिशीनंतरच्या कामजीवनाच्या मर्यादा व पथ्ये यांची कल्पना स्वतंत्र प्रकरणात देण्यात आली आहे. कौटुंबिक कलह कसे टाळावे हे सांगून वृद्धाश्रमातील वास्तव्य व आर्थिक नियोजन याबद्दलही मार्गदर्शन केले आहे. उत्तरायुष्यात



### पुस्तकाची खास वैशिष्ट्ये...

- चाळिसावे वर्ष हा तारुण्यकालातून मध्यमवयाकडे जाणारा महत्त्वाचा टप्पा.
- साठीनंतरच्या उत्तररंगाची जय्यत तयारी करण्यासाठी हा काळ अत्यंत उपयुक्त व श्रेयस्कर
- चाळिशीनंतरच्या प्रमुख शारीरिक तक्रारी व त्याबाबत घ्यायची दक्षता
- उत्तरायुष्याचे आर्थिक नियोजन, मृत्यूपत्र, देहदान, दत्तक विधान याबाबत मार्गदर्शन.
- आयुष्य सुंदर व अर्थपूर्ण करण्यासाठी बहुमोल सूचना

जोपासण्यासारखे छंद, दत्तकविधान, मृत्यूपत्र, मरणोत्तर देहदान व नेत्रदान करण्याची पूर्वयोजना यांचीही माहिती देण्यात आली आहे. एकूणच, आपल्या साठीनंतरच्या जीवनाची सर्वंकष रूपरेषा ठरवण्याच्या दृष्टीने आपली मानसिक तयारी करून घेणारे हे पुस्तक आहे.

चाळिशीचा काळ हा एका परीने उत्साहाचा, स्वप्नपूर्तीचा व भरभराटीचा काळ असतो. साठीनंतरचा काळ हळूहळू सर्वच क्षेत्रांतून लक्ष कमी करण्याचा व निवृत्तीकडे जाण्याचा असतो. चाळिशीतच या साठोत्तरी आयुष्याचे नियोजन केले तर शारीरिक, आर्थिक, मानसिक संतुलन उत्तम राहू शकते व शेवटचे दिवस गोड ठरू शकतात.

परंतु चाळिशीत चुकीच्या सवयींच्या व व्यसनांच्या आहारी गेले, आर्थिक उधळपट्टी केली. तडजोडींचे हीन मार्ग स्वीकारले तर मात्र उत्तरायुष्याचे एकूणच गाडे रूळावरून घसरत आणि वार्धक्य ही शिक्षा ठरते. ज्येष्ठपण हे बिनचेहऱ्याचे व बिनकण्याचे होते.

सत्कार्य, अध्यात्म, नातवंडावरील अकृत्रिम लोभ, आवडते संगीत, बागकामासारखे छंद, व्यसनांपासून मुक्ती, योग्य आहार, योग्य विचार व योग्य विहार याद्वारे उत्तरकाल हा निरामय, निकोप होऊ शकतो. व्यायाम व विश्रांती यांचा योग्य मेळ घालणेही कार्यक्षमतेला उपकारक ठरते.

चाळिशीनंतर त्वचा, डोळे, कान, दात, स्नायू, अस्थी यांच्या कार्यक्षमतेत उणिवा जाणवू लागतात. रक्तवाहिन्यांतील अस्तरावर थर साचून रक्तपुरवठा कमी झाल्यास विशिष्ट अवयवांच्या कार्यक्षमतेत घट होते. उदा.

मेंदू - अर्धांगाचा झटका येणे, एखादा भाग निकामी होणे

डोळा - अंधत्व

हातपाय - एकदम जोरात कळा येणे, ताकद कमी होणे

फुफ्फुस - छातीत खूप दुखणे, दम लागणे

हृदय - छातीत दुखणे, घाम, भीती, दौर्बल्य

पोट - दुखणे

रक्तवाहिन्यातील गुठळ्यांमुळे पायावरही सूज येते व संपूर्ण पाय ठणकतो. रोज ॲस्पिरिनची अर्धी गोळी घेतल्याने गुठळीजन्य आजारांची शक्यता कमी होते.

श्वसनसंस्था, जननसंस्था, पचनसंस्था, - सर्वच संस्थांच्या कामकाजात समस्या निर्माण होतात. नियमित तपासण्या व औषधोपचार यांचा अवलंब त्यामुळे आवश्यक ठरतो. रक्तातील कोलेस्टरॉलचे प्रमाण धोकादाय पातळीवर जाऊ न देणेही इष्ट.

डॉ. सुभाष दांडेकर यांनी मोजक्या शब्दांत चाळिशीनंतरच्या वैद्यकीय समस्यांचे स्वरूप नेमके सांगून त्याबाबतच्या उपाययोजनांची दिशा सूचित केली आहे. मात्र वैद्यकीय सल्ला घेऊनच पुढे पाऊल टाकावे असे पुन:पुन्हा बजावले आहे.

हृदयविकाराची पूर्वसूचना मिळते, तशी लक्षणेही अनेक असतात. चरबी वाढू न देणे, धूम्रपान न करणे, चिडचिड टाळणे, तणावमुक्त राहणे, अंजायनाचा त्रास असेल तर नायट्रोग्लिसरीनच्या गोळ्या सतत जवळ ठेवणे, मधुमेह व रक्तदाब काबूत ठेवणे हे प्रतिबंधात्मक उपाय, तसेच हार्टॲटॅक आल्यानंतरचे उपचार व शस्त्रक्रिया याबाबतही मार्गदर्शन केले आहे.

चाळिशीनंतरच्या कामजीवनाबाबत डॉ.दांडेकर यांनी अनेक सूचना दिल्या आहेत. पुरुष लैंगिकदृष्ट्या कधीच म्हातारा होत नाही. कामभावना अखेरपर्यंत राहते. शीघ्रपतन व ताठरता या बद्दलच्या समस्या काहींना त्रस्त करतात. स्त्रियांची कामभावना या वयात थोडी कमी होते. नावीन्य संपणे, तोचतोपणा वाटणे, लैंगिक आकर्षण ओसरणे, सेक्स हार्मोन्स कमी होणे, ही लक्षणे असली तरी प्रेम व लैंगिक सुख हे समानार्थी शब्द नाहीत याचे भान ठेवून पत्नीला प्रेमाची जास्त गरज आहे हे नवऱ्यांनी लक्षात ठेवायला हवे. साठीनंतरचे लैंगिक सुख हे भावनिक जास्त असते. स्पर्श, आलिंगन, चुंबन याद्वारे ते प्रकट होत असले तरी पतिपत्नीचे मैत्रीपर्व सुरू व्हावे असे डॉ. दांडेकर सुचवतात.

कामवासना ही मोठी ऊर्जा आहे. तिला योग्य मार्ग न मिळाला तर मानसिक व शारीरिक समस्या उभ्या राहतात. पुरुष हा मानसिकदृष्ट्या पत्नीवर फार अवलंबून असतो. स्त्रिया वैधव्य आल्यावरही आनंदात एकाकी जगू शकतात. पुरुषांना विधुरावस्था जड जाते. वार्धक्यात कामसुख नसले तरी चालते,पण साथीदाराशिवाय करमत नाही - हेही खरेच!

डॉ. दांडेकर हे वृद्धाश्रम चालवतात. त्यामुळे त्याबद्दल त्यांनी विस्तृत विवेचन केले आहे. महाराष्ट्रातील शंभरावर वृद्धाश्रमाची नावेही त्यांनी दिली आहेत. वृद्धांना विनामूल्य सांभाळणारेही काही वृद्धाश्रम आहेत. (पृष्ठ ८६)


दिनचर्या या प्रकरणात चालणे, योगासने, व्यायाम, विश्रांती याबद्दल उपयुक्त टिप्स दिल्या आहेत.

हे पुस्तक चाळिशीतल्या प्रत्येकाने काळजीपूर्वक वाचायला हवे. त्यामुळे उत्तरायुष्यातील बऱ्याच समस्या वेळीच लक्षात येऊन त्यांना सामोरे जाण्यासाठी योग्य ती दक्षता घेण्याची मानसिकता तयार होईल, दत्तकविधान, मृत्यूपत्र, देहदान, नेत्रदान, स्वेच्छामरण या बद्दलही आपल्या मनोधारणा निश्चित करण्यासाठी या पुस्तकातील विवेचन परिणामकारक ठरेल.

**किंमत : १०० रु. सवलतीत : ८० रु.**

**सभासदांना : ७५ रु. पोस्टेज : २० रु.**






# विश्वातील सजीवसृष्टी

**अनु. डॉ. बाळ फोंडके**

## विश्वाची निर्मिती कशी झाली, जीवन म्हणजे काय या प्रश्नांची निरनिराळी उत्तरे देणारे पुस्तक

'लाइफ इन द युनिव्हर्स'या इंग्रजी पुस्तकाचे मूळ लेखक मोहिंदरसिंह छड्डा आणि डॉ. बाळ फोंडके हे असून, डॉ. फोंडके यांनी त्याचा मराठी अनुवाद केला आहे.

१९४४ मध्ये व्हॉट इज लाइफ हे अर्वीन श्रडिन्जर या संशोधकाचे पुस्तक प्रसिद्ध झाले. सजीवांच्या जीवनाचे रहस्य भौतिक-रासायनिक घटकांमध्ये सामावलेले आहे असे त्यात सांगण्यात आले होते. गेली साडेतीन अब्ज वर्षे पृथ्वीवर सजीव सृष्टी तग धरून राहिलेली आहे, आपल्या उपजत प्रकृतीत आणि आनुवांशिक गुणधर्मात फेरबदल करण्याची (उत्परिवर्तनाची) क्षमता सजीवांमध्ये असते. ज्याच्याकडे आपली वाढ करण्याची, आपलं पुनरुत्पादन करण्याची, तसेच झालेली झीज किंवा हानी भरून काढण्याची, दुरुस्त करण्याची क्षमता आहे तो सजीव अशी व्याख्या होऊ शकेल. त्याशिवाय उत्परिवर्तनाची व एका पिढीत उपटलेलं उत्परिवर्तन पुढच्या पिढ्यापर्यंत पोचवण्याची क्षमताही सजीवांमध्ये आढळते.

भौतिक-रासायनिक घटक हे सजीवांच्या अस्तित्वाला कारणीभूत असतात हे प्रतिपादन जीवनाचे रहस्य शोधून काढणाऱ्या संशोधकांना नवी दिशा देणारे ठरेल. देवाने या सृष्टीची निर्मिती केली. ही समजूत दूर केल्यावर सृष्टीच्या स्वयंभू निर्मितीच्या सिद्धान्ताला चालना मिळाली. त्या सिद्धान्ताला कायमची मूठमाती लुई पाश्चरच्या १८६० मधील संशोधनाने मिळाली. १९२४ मध्ये रशियन जीवरसायन शास्त्रज्ञ अलेक्झांडर ओफरिन याने भौतिक पदार्थांच्या उत्क्रांतीतूनच सजीवांचा उगम झाला असे मत मांडले.

जॉन हॉल्डेन या शास्त्रज्ञाने १९२८ मध्ये दि ओरिजिन ऑफ लाइफ या पुस्तकात पृथ्वीवर आदिम अवस्थेतल्या वातावरणात अतिनील किरणांच्या प्रभावाने घडलेल्या रासायनिक प्रक्रियांची परिणती शर्करा व प्रथिने या सेंद्रिय रसायनांच्या निर्मितीत झाली आणि या रसायनांच्या महासागराचं रूपांतर गरमागरम सुपासारख्या पदार्थात झालं... विश्वाच्या उत्पत्तीतच सजीवांच्या उत्पत्तीची बीजं

## पुस्तकाची खास वैशिष्टये...

- ह्या विश्वाचा जन्म कसा झाला?
- जीवन म्हणजे काय? सजीवांत विविधता का दिसते?
- काही मोजक्या घटकांपासून ही विविधता साध्य करण्यातील रचनाबंधांची अपुर्वाई
- मूलभूत रेणू सर्व जीवांमध्ये सारखे?
- विश्वाचं रहस्या कशात सामावलेले आहे? अशा पध्श्नांची उत्तरे देणारे नवे संशोधन.

आहेत...

हे विश्व किती मोठे आहे? याची कल्पना करणेही कठीण आहे. त्यात शंभर अब्ज आकाशगंगा आहेत; आणि त्या प्रत्येक आकाशगंगेत शंभर अब्ज तारे आहेत. म्हणजे एक लाख परार्ध या संख्येएवढे तारे. सूर्य हा एक तारा. त्याच्या प्रभावळीत नऊ ग्रह, ५३ उपग्रह, हजारो उल्का आणि अब्जावधी धूमकेतू आहेत. प्रकाशकिरण एका सेकंदात तीस लाख किलोमीटर अंतराचा पल्ला गाठतो. म्हणजेच एका सेकंदात सात वेळा पृथ्वीप्रदक्षिणा घालू शकतो. प्रकाश मिनिटाच्या भाषेत सांगायचे तर पृथ्वीपासून सूर्य आठ प्रकाशमिनिटांच्या अंतरावर आहे. आपल्या आकाशगंगेतील काही तारे पृथ्वीपासून१५ हजार ते एक लाख प्रकाशवर्षाच्या अंतरावर आहेत. तारे म्हणजे रासायनिक मूलद्रव्ये निर्माण करणारे कारखानेच.

विश्वाचा जन्म कसा झाला हा प्रश्न माणसाला आदिकाळापासून सतावतो आहे.

विश्वाचा जन्म शून्यातून झाला.

आकारमान नसलेल्या या शून्यात अंतर्गत सूक्ष्म जागेत भयंकर दाटीवाटी झाली. त्याचं तापमान उच्च कोटीला पोचलं. तिथला ताण असह्य होऊन महाविस्फोट झाला. अमर्याद ऊर्जा आणि धगधगते वायूचे लोळ सगळीकडे पोचले. आरंभी केवळ हायड्रोजन आणि हेलियम हे दोनच वायू निर्माण झाले. महाविस्फोटानंतर दहा कोटी वर्षे गेली. तरी विश्वाला निश्चित आकार आलेला नव्हता. त्यानंतर आकाशगंगांनी आकार घ्यायला आरंभ केला. आज सूर्याचा आकार साधारण १४ लाख किलामीटर आहे. तो गर्भावस्थेत असताना त्याचा व्यास काही हजार अब्ज किलोमीटर असावा. एवढ्या मोठ्या प्रमाणावर आकुंचन होत असल्यामुळे अंतरंगातल्या तापमानची वाढ होत राहते. तापमान एक कोटी अंशापर्यंत पोचल्यावर त्यातील हायड्रोजन वायूची अणुकेंद्रे एकमेकांवर इतक्या जोराने आपटतात, की त्यातील अणूंचे संमीलन होऊन त्या अणुसंमीलनाच्या प्रक्रियेची परिणती हायड्रोजनहून भारी असलेल्या हेलियममध्ये होते. त्याचप्रमाणे काही वस्तुमानाचं



ऊर्जेत रूपांतर होते. १ हजार टन हैड्रोजनचे हेलियममध्ये रूपांतर होते, तेव्हा त्या हेलियमचे वस्तुमान वस्तुमान ९९३ टन एवढेच भरते. उरलेल्या ७ टन वस्तुमानाचे ऊर्जेत रूपांतर होते. सूर्यासारखे तारे याच प्रक्रियेतून ऊर्जेचे प्रक्षेपण करतात.

१९५३ मध्ये केंब्रिज विद्यापीठातील फ्रान्सिस क्रिक आणि जेम्स वॉटसन या दोघांनी डीएनए (डी ऑक्सीरायबो न्युक्लिक ॲसिड) या त्रिमिती रचनेसंबंधी घोषणा केली. या डीएनएच्या अंतरंगात त्या त्या पदार्थाच्या रेणूंची जडणघडण करण्यासाठी आवश्यक ती माहिती सांकेतिक रूपात साठवून ठेवलेली असते. डीएनए म्हणजे आनुवांशिक गुणधर्मांचा कारक रेणू. सापाचे युगल एकमेकांना वळसे घालत घट्ट मिठी मारून बसावे किंवा वक्राकृती जिना असावा त्याप्रमाणे डीएनएमध्ये न्यूक्लिओटाइडचे दोन धागे एकमेकांना वळसे घालत दुहेरी गोफच विणतात. या दुहेरी गोत्याच्या घटक धाग्यातले शर्करेचे रेणू हे डिऑक्सिरायबोज शर्करेने बनलेले असून, त्यात ॲडेनिन, थायमिन, ग्वॅनिन आणि सायटॉसिन अशा चार पायऱ्या रचणारे घटक असतात.

काही अप्रगत जीवामध्ये डीएनएऐवजी आरएनए या दुसऱ्या न्युक्लिक आम्लाला प्राधान्य मिळालेले आहे. आरएनएमधले शर्करेचे रेणू रायबोज प्रकारचे असतात आणि चार घटकांपैकी थायमिनच्या जागी युरॅसिल असते.,

स्वत:च स्वत:चं पुनरुत्पादन करण्याची कुवत असणारे न्युक्लिक आम्लांचे रेणू हे प्रत्येक प्रजातीच्या आनुवंशिक गुणधर्मांचा साठा करणारे व स्थिर असतात. मात्र त्यांच्यातही उत्परिवर्तनाची क्षमता असते.

काही मोजक्या सर्वसाधारण घटकांपासून फार मोठ्या प्रमाणावरची विविधता निर्माण केली जाऊ शकते. ही सजीवांच्या रचनाबंधाची एक खासियत आहे.

एखादा लहान सूक्ष्म जीव असो, की महाकाय सस्तन प्राणी असो, मूलभूत रेणू सर्व सजीवांमध्ये सारखेच असतात. सजीव सृष्टीचा इमला रचणाऱ्या विटा व सिमेंट असे त्यांना मानता येईल. या विटा-दगडांमधून सुबक व कार्यक्षम अशी जीवन नावाची इमारत उभी राहते. रेणूंच्या अंगभूत गुणधर्मामध्येच विश्वाचं रहस्य सामावलेलं आहे. विश्वामध्ये असलेली उपजत अस्वस्थता आणि रेणूमधील रासायनिक घटकांचे अंगभूत गुणधर्म यांच्या मिलाफातून प्राथमिक अवस्थेतले साधे सेंद्रिय रेणू तयार झाले; ते एकत्रित जोडले जाऊन त्यातून अधिक गुंतागुंत असलेले रेणू तयार झाले. दोन वेगवेगळ्या जातीच्या रेणूंची टक्कर होऊन धन विद्युतभार असलेले प्रक्रियाक्षम रेणू तयार होणे व त्यांच्या परस्पर रासायनिक प्रक्रियेतून अंतराळातील सेंद्रिय रेणूंची निर्मिती होणे हे स्वाभाविक मानायला हवे असे शास्त्रज्ञानां वाटते. उल्कांचे पृथक्करण केल्यावर हे विशेष जाणवते.

विश्वातील सजीव सृष्टी या पुस्तकात अशा माहितीचे प्रचंड भांडारच भरलेले आहे. धरतीवर जीवसृष्टीचा उदय कसा झाला आणि या विश्वात मानव हा फक्त पृथ्वीवरच अस्तित्वात आहे का, या प्रश्नावर जगभर शास्त्रज्ञांचे संशोधन चाललेले आहे. त्याचे हे ठळक तपशील वाचून वाचकांची मती गुंग होईल.

**किंमत : ६०रु. सवलतीत : ५१रु.**
**सभासदांना : ४५ रु. पोस्टेज :२०रु.**

# श्रद्धांजली

**श्रीराम कामत**

ज्येष्ठ लेखक व पत्रकार श्रीराम कामत यांचे रविवारी, दहा मार्च रोजी हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते.


गेल्या पिढीतील प्रयोगशील लेखकांपैकी ते एक होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेडी या गावात  दगडांच्या खाणीमुळे झालेला बदल टिपणारी भीष्माचा डोंगर ही त्यांची कादंबरी वेगळा विषय व मांडणीमुळे बहुचर्चित झाली होती. या त्यांच्या कादंबरीशिवाय झापडप आणि पूर्णविराम या अन्य दोन कादंबऱ्याही प्रयोगशील लेखनाचा वारसा सांगणाऱ्या होत्या.

सत्यकथा, दीपावली, वसुधा, वीणा या नामांकित नियतकालिकांतून त्यांनी कसदार कथालेखन केले. १९४७ च्या सत्यकथेच्या दिवाळी अंकात अरविंद गोखलेंची कातरवेळ, पु.भा.भावे यांची स्वप्न आणि व्यंकटेश माडगुळकरांची त्याी गाय व्याली या लघुकथांच्या बरोबरीने त्यांची लघुकथाही वावचकांनी नाववजली होती. रेनमेकर या इंगजी नाटमाचा आले देवाजीच्या मना या नावाने त्यांनी अनुवाद केला होता.

कथा, कादंबरी लेखनाबरोबरच त्यांनी पत्रकारिताही केली. १९४५ पासून नवयुग आणि नवभारत नियतकालिकांचे ते काम करत. दै. नवशक्ती सहसंपादक म्हणून ते काम करत होते. १९५० नंतर मात्र त्यांनी लेखन, पत्रकारिता याकडे जवळ जवळ पाठ फिरवली व एस.टी. महामंडळात ते काम करू लागले. तेथेही ते विविध उपक्रमांत असतच.

गेली काही वर्षे ते हृदयविकाराने आजारी होते. रविवारी सायंकाळच्या सुमारास अस्वस्थ वाटू लागले म्हणून रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र रात्री साडेअकराच्या सुमारास त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. त्यांच्या पश्चात महाराष्ट्र टाइम्सचे सहसंपादक सतीश कामत तसेच रोहित व जयदीप असे तीन पुत्र आहेत.





# फुले आणि काटे

## प्रकाशक परिषदेचे विचारमंथन

मराठी प्रकाशक परिषदेच्या औरंगाबाद येथे झालेल्या अधिवेशनात मराठी प्रकाशन व्यवसायाच्या आजच्या स्थितीवर जशी चर्चा झाली तशीच राज्याच्या साहित्य संस्कृती मंडळाच्या अस्तित्वावरही उलटसुलट मते व्यक्त करण्यात आली. पुस्तके प्रसिद्ध करणे हा जसा व्यवसाय आहे तसा तो एक सांस्कृतिक व्यवहारही आहे, हे मान्य केले तर ग्रंथ ही 'घटना' असते आणि तिचा कोणत्याही समूहाच्या जगण्याशी निकटचा संबंध असू शकतो हे मान्य करण्यात काहीच अडचण येण्याचे कारण नाही.

मराठी माणूस स्वखर्चाने पुस्तक विकत घेण्यात काकू करतो आणि त्यामुळे हा व्यवहार दिवसेंदिवस अधिकाधिक संकटात सापडतो आहे, हे प्रकाशक मंडळींचे म्हणणे सर्वचजण अनुभवत आहेत. पुस्तकांचा खप वाढण्याच्या काळात मनोरंजनासाटीचे आणि माहितीसाठीचे आकाशवाणीसारखे सशक्त माध्यम आले तरी त्याचा पुस्तकांच्या खपावर म्हणावा तसा परिणाम झाला, असे म्हणता येणार नाही, मात्र दूरचित्रवाणीचे माध्यम पुस्तकेच काय चित्रपटासारख्या व्यवसायावरही घाला घालणारे ठरले. त्यामुळे वाचन ही माकडाच्या शेपटासारखी हळूहळू संपत जाणारी गोष्ट आहे की काय, असे वाटण्याची वेळ आली आहे. मराठी प्रकाशन व्यवसाय त्यामुळे अधिकच अडचणीत येऊ लागला आणि त्यामुळे प्रकाशकांनी हुकुमी पैसे मिळू शकणारी माध्यमे शोधायला सुरुवात केली. चांगली पुस्तके काढण्यासाठी काही 'खपाऊ' पुस्तके काढणे आवश्यक ठरते हे त्यांचे म्हणणे फारसे चुक म्हणता येणार नाही.

स्वांतंत्र्यापूर्वीपासूनच ग्रंथव्यहाराच्या आर्थिक उलाढालीत महत्त्वाची भूमिका बजावणारा पाठ्यपुस्तक निर्मितीचा व्यवसाय राज्य शासनाच्या मध्यस्थीमुळे 'शासकीय'झाला. त्याचे दूरगामी परिणाम प्रकाशन व्यवसायावर झाले असावेत,असे प्रकाशक परिषदेच्या अध्यक्षांच्या भाषणावरून दिसते. अध्यक्ष सुधाकर जोशी यांनी पाठ्यपुस्तके पुन्हा एकदा खासगी प्रकाशकांकडे सोपविण्याची मागणी केली असली तरी ती आता व्यवहार्य नाही. मात्र, 'ग्रथाली' सारख्या वाचक चळवळीच्या व्यवहारांची चौकशी करण्याची जाशी यांची मागणी प्रकाशकच नव्हे, तर वाचकांनाही विचार करायला लावणारी आहे.

विक्रेत्यांना अधिक कमिशन देऊन पुस्तकांचा खप वाढविण्याचा जो व्यवसाय आताच्या

काळात रूढ हाऊ पाहत आहे, त्याला चळवळ म्हणणे कितपत संयुक्तिक ठरेल, हा प्रश्न वाचकांनाही भेडसावतो आहे, तसाच अशा चळवळीचा हेतू ग्रंथव्यवहार वाढीस लावण्याचा आहे, की प्रकाशन व्यावसायिकांशी स्पर्धा करण्याचा आहे, अशीही शंका वाचकांना येते आहे. लेखकांकडून पुस्तक लिहून झाल्यानंतर ते तयार करणाऱ्या प्रकाशकांना ते विकण्यासाठी उपालब्ध असलेल्या विक्रेत्यांच्या साखळीचा आधार घ्यावा लागणार हे निश्चितच. पण विक्रेत्यांच्या हाती आपला व्यवसाय जाणार नाही, याची खबरदारी वेळीच घेण्यात प्रकाशक कमी पडले व त्यामुळेच ग्रंथालीसारखी चळवळ वाचकांच्या मदतीने वाढती आणि फोफावली. नंतरच्या काळात या चळवळीतही व्यावसायिकता आली हा भाग वेगळा.

पुस्तकांचा व्यवसाय वाढीस लागावा यासाठी प्रकाशकांनी केवळ पुस्तके तयार करून चालणार नाही त्यासाठी नवनव्या कल्पना आचरण्यात आणण्याची करज आहे. नवे विषय आणि नव्या कल्पना अमलात आणताना परदेशातील प्रकाशक किती विविध माध्यमे वापरतात याचा अभ्यासही व्हायला हवा. 'हॅरी पॉटर'सारखी कादंबरी भारतासारख्या देशात ज्यांना इंग्रजी वाचता येते अशा मुलांमध्ये एवढी लोकप्रिय का झाली, याचाही अभ्यास व्हायला हवा. वाचकाला काय हवे आणि कसे हवे याचा विचार करून पुस्तके निर्माण करण्यात मराठी प्रकाशक अन्य भाषक प्रकाशकांच्या तुलनेत कमी पडतो की काय अशी शंका त्यामुळे येते.

नाही म्हणायला मराठीतही अशी लोकप्रिय पुस्तके नाहीत, असे कुठे आहे?

श्यामची आई, स्वामी, राजा शिवछत्रपती, एक होता कार्व्हर, यासारख्या काही मोजक्या ग्रंथांना वाचकप्रियतेचे बिरूद मिरवायला मिळाले आहेच की. जनजीवनाचा वाढता वेग लक्षात घेता पुस्तकांच्या अस्तित्वाने जगणे संपन्न करण्यासाठीच्या युक्त्या लढविणे ही व्यवसायाची आवश्यकता आहे, हे तरी किमान मान्य करायला हवे.

साहित्य संस्कृती मंडळ बरखास्त करण्याची जोशी यांची मागणी मात्र वेगळ्याच कारणामुळे गाजली. शासकीय निधीतून चालणाऱ्या या मंडळाच्या कारभाराची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केल असती तर ते अधिक योग्य झाले असते. परंतु मंडळ बरखास्त करून किंवा तेथील अधिकाऱ्यांना पुस्तक विक्रीच्या प्रमाणात पगार देण्याची मागणी व्यवहार्य नाही. कशाचा तरी राग कशावर तरी काढण्यासारखा हा प्रकार झाला.

साहित्य संस्कृती मंडळाने आपले सारे व्यवहार शासकीय पद्धतीनेच चालवायला हवेत असे नाही. कोणती पुस्तके प्रकाशित करायची आणि कोण्त्या पुस्तकांना प्रकाशनासाठी आर्थिक मदत द्यायची याचे निकष स्पष्ट नसल्याने कोणतेही पुस्तक साहित्य संस्कृती मंडळाच्या मदतीने प्रकाशित होते. हे निकष अधिक काटेकोर करण्याची मागणी खरे तर जोशी यांनी करायला हवी होती. मंडळाची पुस्तके वाचकांना मिळूच द्यायची नाहीत, असा अलिखित नियम असल्याने ती सहज उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी वाढतच आहेत. मंडळ बरखास्त करणे हा त्याला पर्याय होऊ शकत नाही. आजही मराठी पुस्तकांची आवृत्ती हजार प्रतींचीच निघते आहे. मराठी माणूस गेल्या शंभर वर्षाच्या काळात अधिक प्रमाणात साक्षर झाला एवढेच नव्हे तर त्याच्या आर्थिक अवस्थेतही बऱ्यापैकी बदल झाला हे मान्य केले तर आवृत्तीच्या प्रती वाढत नसल्याचे दुःख वाटून घ्यायचे की त्याबद्दल आत्मपरीक्षण करायचे हेही आता ठरवायला हवे. पुस्तकांच्या



भरमसाट किमती हे जर त्याचे कारण असेल तर त्याचाही गांभीर्याने विचार व्हायला हवा. हॉटेलमध्ये सहज शंभर रुपये खर्च करणारे किंवा दूरचित्रवाणीवर दरमहा किमान दोनशे ते तीनशे रुपये खर्च करणारे मराठी कुटुंब तेवढ्याच पैशांचे पुस्तक खरेदी करीत नाही, असा विचार करण्यापेक्षा वाचन संस्कृती विकसित करण्याचे प्रयत्न अधिक जागरूकपणे होणे गरजेचेच नव्हे, तर आवश्यक आहे, हे आता तरी ध्यानात यायला हवे.

मुकुंद संगोराम

## जन्मकहाणी 'श्यामची आई' पुस्तकाची

१९३५ म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातील गोष्ट. यशवंतराव चव्हाण कायद्याचा अभ्यास करण्यासाठी कोल्हापूर मुक्कामी वास्तव्याला होते. कायद्याची पदवी घेऊन गरीब रयतेची सेवा व राष्ट्रकार्य म्हणून राजकारणात उडी घेण्याचा त्यांचा विचार होता. एक दिवस त्यांचे एक मित्र प्रकाशक कोपर्डेकर हे त्यांना भेटायला आले. त्यांनी यशवंतरावांच्या हातात हस्तलिखिताचे एक चोपडे ठेवले आणि म्हटले ''मित्रा, हे हस्तलिखित मी छापावे का? वाच आणि तुझा अभिप्राय दे!'' मा. यशवंतरावांनी ते हस्तलिखित आपल्या मेजाच्या कप्प्यात ठेवून दिले. त्यानंतर सहा महिन्यांनी कापर्डेकरांनी त्या हस्तलिखिताची विचारणा करताच यशवंतराव म्हणाले , ''मित्रा, कायद्याचा अभ्यास व परीक्षा यामुळे तुझे ते हस्तलिखित वाचायला मी पार विसरून गेलो, पुढच्या वेळी वाचून माझा अभिप्राय देईन.''

थोड्याच दिवसात यशवंतरावांनी ते हस्तलिखित विरंगुळा म्हणून वाचायला घेतले. पुस्तक चाळता चाळता यशवंतराव त्या पुस्तकात इतके रंगले की, एका रात्रीत अखंड वाचत राहिले. त्यांनी कोपर्डेकरांना 'ताबडतोब येऊन भेट' असा निरोप पाठवला. नुकताच प्रेमविवाह करून संसार थाटण्याचे स्वप्न पाहणाऱ्या व घरच्यांचा विरोध म्हणून बेघर अवस्थेत कोपर्डेकर आपल्या बायकोसह येऊन हजर झाले. हा प्रेमविवाह हस्तलिखिताच्या लेखकांच्या प्रेरणेनेच झालेला होता व ती तरुणी त्या महान लेखकाची आप्त होती. कोपर्डेकरांनी पत्नीची ओळख करून दिली. यशवंतराव आपल्या मित्राला म्हणाले, ''गड्या, त्या हस्तलिखिताचे पुस्तक प्रकाशित झालेच पाहिजे. इतके दिवस ते बासनात पडून राहिले, त्याचे मला दुःख वाटते. परंतु तू आता विलंब न करता हे पुस्तक छापून घेच. हे पुस्तक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात अमर होईल.''

या महन्मंगल पुस्तकाचे नाव 'श्यामची आई'. पुढे त्या पुस्तकाने खरोखर एक इतिहास घडवला. वात्सल्य, करुणा आणि मातृप्रेमाचे ते महान काव्य वाचून आमची पिढी सुसंस्कारित झाली. हे पुस्तक म्हणजे तुरुंगात राजबंदी असताना साने गुरुजी यांनी तुरुंगातील आपल्याबरोबरच्या देशप्रेमी सहकाऱ्यांना सांगितलेल्या आपल्या परमप्रिय मातेच्या आठवणी. याच पुस्तकावरील घेतलेला 'श्यामची आई' या बोलपटाला स्वातंत्र्योत्तर काळात पहिले राष्ट्रपतीपदक मिळाले. यशवंतरावांनी केलेली भविष्यवाणी खरी ठरली. या बोलपटाचे सर्वेसर्वा होते आचार्य अत्रे.

साने गुरुजी, यशवंतराव व आचार्य अत्रे या अचाट व अफाट कर्तृत्वाच्या त्रयींचा 'श्यामची आई'शी असा संबंध आला.

# नवीन स्पर्धा

खाली काही पुस्तकांची नावे दिली आहेत. यात अनुवादित पुस्तकेही आहेत. आपण यापैकी कोणती पुस्तके अनुवादित आहेत ते ओळखा व बक्षीस मिळवा.

**लाईफस्टाईल, रेशीमगाठी, आय डेअर : किरण बेदी, निसटलेले, सिलेक्टिव्ह मेमरी, मालनगाथा, अस्वस्थ दशकाची डायरी, कारगिलनामा, ख्यातनाम इतिहासकार, बिझिनेस महाराजे, युगंधर, कैलासवासी मुंबई, नवी स्त्री, फिअर इज द की, बालकांड, ब्लास्फेमी, भंडारभोग, वडवाई, जिद्द, रेशीमरेघा, पर्व, चौघीजणी, विद्रोही, अंधाराचे वारसदार, गटुळं, अणसार, द्वंद्व, मूल, मोराचे पाय, फॅक्टरी गेट, पूजाघर, द सिस्टरहूड, एकवचनी, गाजव्यथा, मंदिरा, कोमा, महात्मा, चौडकं, हितगुज, डॉ.झिवागो**

**स्पर्धेत भाग घेण्यासाठी मेहता मराठी ग्रंथजगतचे सभासद असणे आवश्यक!**

बरोबर उत्तर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून येणाऱ्या पहिल्या तीन स्पर्धकांना आपल्या पसंतीचे प्रत्येकी २०० रुपयांचे पुस्तक बक्षीस.

**मुदत १५ मे२००२ पर्यंत**

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथ जगत,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.

## आगामी आगामी आगामी

## वीरप्पन

**मूळ लेखक : सुनाद रघुराम**
**अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर**

खंडण्या वसूल करणारा, अपहरणे करणारा, दहशतवाद निर्माण करणारा हा खुनी दरोडेखोर, तस्कर दोन राज्य सरकारांना आदेश देण्याइतका माजतो.

**हा वीरप्पन कशाच्या बळावर एवढा पुंड झाला?**
**उपग्रहांच्या मदतीने चालणारी दळणवळण यंत्रणा, प्रगत तंत्रज्ञान, हेलिकॉप्टर्स हाताशी असतानाही वर्षानुवर्षे वीरप्पन पोलिसांच्या हाती का लागू शकत नाही?**

सुनाद रघुराम यांनी या प्रकरणातील सर्व दस्तऐवज मिळवून व ते कसोशीने तपासून, अंगावर काटा आणणारे वीरप्पनचे गुन्हेगारी जीवन व त्याचे इतरांशी असणारे संबंध यांचा या पुस्तकात अचूक वेध घेतला आहे.
एखाद्या कल्पितापेक्षाही हे वास्तवाचे चित्रण वाचकाला खिळवून टाकते!

**किंमत : २२०रु.**



# वाचकांचा प्रतिसाद

आपला दर महिन्याचा अंक सर्वार्थाने वाचनीय असतो. विशेष म्हणजे आपण कोणती पुस्तके आणि अवश्य का वाचावीत याविषयी या अंकात केलेले मार्गदर्शन लाख मोलाचे आहे. कारण हल्लीच्या धावपळीच्या काळात सगळी पुस्तके वाचावयास वेळ मिळत नाही. आपल्या अंकातून मिळत असलेल्या साहित्यवार्तेमुळे, निरनिराळ्या ठिकाणी मोठ्या उत्साहाने साहित्य विषयक आणि सांस्कृतिक कार्यक्रम होतात हे पाहून मराठी भाषेचे भवितव्य अजिबात चिंताजनक नाही याची खात्री पटते. तुमच्या संपादकीयमध्ये वाङ्मयीन आणि सामाजिक जगातील नव्या समस्यांचे यथायोग्य दर्शन घडते. आणि त्यामुळे अतिशय सुबोध भाषेतील लिहिलेले तुमचे संपादकीय मन ताजेतवाने करते. आपल्या उपक्रमाला मन:पूर्वक शुभेच्छा.

**डॉ. पी.सी.शेजवलकर, पुणे.**

संपादक,

'ग्रंथजगत'चे अंक नियमाने मिळतात. चांगले असतात. संपादकीय आणि साहित्यावार्ता यात मला विशेष रस (इंटरेस्ट) असतो. या अंकातले संपादकीय पटले-आवडले. मी आपल्या मतांशी सहमत आहे.

**गिरीजा कीर, मुंबई**

◆ एप्रिल २००२
◆ वर्ष दुसरे
◆ अंक पाचवा

# मेहता मराठी ग्रंथजगत

✠ संपादक :
सुनील मेहता
✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा
✠ संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर
✠ अंकाची किंमत १० रु.
✠ वार्षिक वर्गणी ८० रु.
तीन वर्षाची २००रु.
पाच वर्षांची ३००रु.
✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.
✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **पुरस्कार** | २२ |
| **पुस्तक परिचय** | |
| सुवर्णमुद्रा : शान्ता शेळके | २६ |
| मुक्तिशोध- यात्रा : डॉ. राजेंद्र प्रभुणे | २९ |
| शेवटची लढाई : डॉ. आनंद यादव | ३४ |
| चाळिशीनंतरची वाटचाल :डॉ. सुभाष दांडेकर | ३८ |
| विश्वातील सजीवसृष्टी : डॉ. बाळ फोंडके | ४१ |
| **श्रद्धांजली** | ४४ |
| **फुले आणि काटे** | ४५ |
| **नवी स्पर्धा** | ४८ |

✠ मांडणी-अक्षरजुळणी :
***मेहता पब्लिशिंग हाऊस***

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.
फॅक्स : ०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*